नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक ४ * * चंद्रपूर * | शुक्रवार, दिनांक ४ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## मुसळधार पावसामुळे चारधामा यात्रा रोखली

■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ३ :**
उत्तराखंडमधील मुसळधार पावसामुळे चारधाम यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले की, भाविकांसाठी प्रवास मार्ग पूर्णपणे सुरक्षित झाल्यावरच यात्रा सुरू केली जाईल.

उत्तराखंडमधील केदारनाथ मार्गावर सोनप्रयागजवळ बुधवारी रात्री भूस्खलन झाले आणि रस्ता बंद करण्यात आला. यादरम्यान ४० भाविक अडकले. एसडीआरएफ पथक घटनास्थळी पोहोचले आणि सर्वांना सुरक्षित बाहेर काढले. गेल्या ४ दिवसांपासून राजस्थानमध्ये पाऊस सुरू आहे. बुधवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर अजमेर शरीफ दर्गा संकुलात २ फूट पाणी साचले होते.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## आपले मराठी साहित्य

मराठीला आता अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. मराठी भाषेचा अभिजात दर्जा देऊन आपण किंवा कोणीही उपकार केलेला नाही. कारण मराठी भाषेची समृद्धी निश्चित अत्यंत उपयुक्तता आणि अमूल्य दर्जाची आहे. आपण या सर्व गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत. आपले साहित्य इंग्रजाळलेले आहे असे म्हणणारे अनेक महाभाग आहेत. काही अंशी ही गोष्ट खरी असेलही. पण आधुनिक काळातील हे वांड्मःय अस्सल मराठी आहे. हेही सत्य आहे. अनेक शतकांपूर्वी, मराठा तितुका मेळवावा हे तीन शब्द महाराष्ट्राच्या शूर मराठी जनतेने हृदयात करून ठेवले होते. याचा अर्थ इतर भाषांना लोळवावा असे नाही. प्रत्येक भाषेचे महत्त्व महाराष्ट्राने समजून घेतलेले आहे. म्हणूनच आता मराठीचे बरेचसे प्रकाशक इतर भाषेतील सकस वांड्मःय आणि मराठी भाषेत प्रकाशित करीत आहेत. ही बाबही तेवढीच महत्त्वाची आहे. आम्ही मराठी भाषेचे एवढे गोडवे गायलेले आहेत. मात्र त्यात मराठीसाठी राजकारण अजिबात नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या महाराष्ट्राच्या भूमीतून जी हिंदवी स्वराज्याची जी स्थापना केली होती. त्यांनी काही फक्त महाराष्ट्राच्या स्वराज्याची कल्पना केली नव्हती. तरीही अनेक मराठा वीरांनी छत्रपतींच्या काळात स्वतःच्या प्राणांची आहुती दिली. इंग्रजांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी अनेक मराठा वीरांनी आपले बलिदान दिले. त्या मराठ्यांनी आपल्या देशाचा गौरव वाढवण्यासाठीच हे पुण्यकर्म केले होते. आपला मराठी गडी हाती तलवारही घेतो. त्यासोबतच तो वारकरीही होतो आणि काही नसले तरी बैलाशिवाय स्वतःला नांगराला जुंपून शेतीही नांगरतो, हे सध्याच्या घडीचे जळजळीत वास्तव आहे. हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे. पण हे सर्व करताना आपण मराठी आहोत. याचे भान कधीही सुटत नाही. आज देशामधील प्रत्येक मोठ्या शहरात आणि प्रत्येक प्रांतांमध्ये राहणारे मराठी जन त्या त्या प्रांताशी समरस होऊन राहतात. मात्र जेव्हा मराठीची बात येते. तेव्हा मराठी साहित्याला आणि मराठी नटसंपदेला शिरावर घेऊन आणि अग्रस्थानी ठेवून इतर कोणीही नाचताना दिसत नाही. मराठी साहित्याने मराठीची पताका हातात घेऊन, आपला मराठा धर्म कीर्तिमान बनावा. म्हणून मराठी भाषेला पूजा स्थानात ठेवलेले आहे. आपल्या जीवनात राजकारणाला मोठे महत्त्व असते. महाराष्ट्राला आणि मराठी मनाला नाटक आणि राजकारण याशिवाय जगताच येत नाही. आज कालच्या राजकारणात साहित्य आणि कलेचा विचार करायला कोणालाही वेळ नसतो. कारण आज कालचे राजकारण प्रचंड गुंतागुंतीचे आणि विचार विभिन्नतेचे आहे. त्यासोबतच हे राजकारण निष्ठा बदलण्याचे वारे अंगात भिनवूनच वाटचाल करीत आहे. मराठी साहित्याला स्वातंत्र्योत्तर काळात सध्याची थोडीफार उतरती कळा लागलेली दिसते. त्याचे कारण आपण शोधलेच पाहिजे. संत ज्ञानेश्वरांपासून ते तुकारामांपर्यंत अनेक संत घराण्यांची परंपरा साहित्यासह चौफेर जनकल्याणाचीच होती व आहे. गेल्या काही दिवसात मराठी साहित्यही एकसुरी झाल्यासारखे वाटते. तरीही राजकीय परिवर्तनानंतर सामाजिक परिवर्तन करण्याची शक्यता केवळ साहित्यातच आहे. हे आमच्या नव्या पिढीला आजपर्यंत जणू कळलेलेच नाही. यामुळेच आता सर्वच्या सर्व भेदाभेदांना दूर करण्यासाठी सर्वभाषा समभावाचा नवा मंत्र मराठी साहित्याने स्वीकारला पाहिजे. आपले लेखक, कवी, कथाकार नाटककार, वृत्तपत्रकार काय आणि कसे लिहितात. यावर चिंतन करून या मंडळींचा समाजाला कितपत उपयोग आहे. याचीही चर्चा केली पाहिजे. साहित्य समाजासाठी असते. त्यामुळे समाजाचे भले होईल असे साहित्य आपण निर्माण केले पाहिजे. आपल्या मराठी साहित्य कृतींना जेव्हा संपूर्ण समाज डोक्यावर घेऊन नाचेल. तेव्हाच साहित्याचा खरा फायदा जनतेला होऊ शकेल. अन्यथा तुम्ही कितीही साहित्य निर्मिती करा. लेखन करा. तुम्हाला कोणीही विचारणार नाही. या सूत्राचा विचार आमचे मराठी साहित्यिक करतील. अशी आमची आशा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# सरकारविरोधात विरोधकांचे आंदोलन



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :**
महाविकास आघाडीच्या सदस्यांनी आज विधानभवनात पायऱ्यांवर निदर्शने करत सरकारच्या भ्रष्टाचाराचा निषेध केला.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळातील मंत्री आपल्या अधिकारांचा गैरवापर करून राज्यातील जमिनी बळकावत आहे. सत्ताधारी वारी सारख्या हिंदू धर्मातील पवित्र मार्गाला अर्बन नक्षल म्हणून विठुरायाला आणि वारकऱ्यांना बदनाम करत आहेत, असा आरोप करीत आज विधान भवनाच्या पायऱ्यांवर सत्ताधाऱ्यांच्या या अपमानकारक जुलमशाही विरोधात महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले.

घोटाळेबाज सरकारचा धिक्कार असो, शेतकरी उपाशी मंत्री तुपाशी, वारकऱ्यांना अर्बन नक्षल म्हणणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, भूखंड लाटणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, वारीला बदनाम करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा धिक्कार असो, भूखंडाचा श्रीखंड खाणाऱ्या भ्रष्ट मंत्र्यांचा धिक्कार असो, अशी जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली.

यावेळी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील प्रभू यांच्यासह महाविकास आघाडीचे बहुतांश आमदार उपस्थित होते.

### संविधान पकडून वारीत चालणारे अर्बन नक्षली कसे?



हे संविधान आमच्या हातात आहे. बंधुत्व, समता व समानता हे या संविधानाचा गाभा आहे. हे बंधुत्व, समता व समानता कुठून आले? ते तुकोबांच्या गाथेतून आले. माऊलींच्या शिकवणीतून आले. गोरा कुंभारांच्या अभंगातून आले. सावता माळीने त्याची शिकवण दिली. सर्व संतांनी आम्हाला याची शिकवण दिली. अखेरीस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ते कायद्यात गुंफून संविधानाची निर्मिती केली. हे संविधान हातात पकडून वारीत चालण्यास अर्बन नक्षल म्हणणार असाल, तर आम्ही सर्व अर्बन नक्षलवादी आहोत, अशी टीका राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सरकारवर निशाणा साधताना केली.

### वारकऱ्यांना नक्षली म्हणण्याचे पाप केले



महायुती सरकारने वारकऱ्यांना नक्षली म्हणण्याचे पाप केल्याचा आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. वारकरी पांडूरंगाची सेवा अत्यंत मनोभावे करतात. पण सरकारची भूमिका चुकीची आहे. हे सरकार वारीला, पांडुरंगाला, परमेश्वराला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहे. वारकऱ्यांना नक्षलवादी म्हणण्याचे पाप सत्ताधारी पक्षाचे नेते करत आहेत. त्याविरोधात आम्ही आंदोलन केले, असेही अंबादास यावेळी म्हणाले.

## भारतात लोकशाही ही व्यवस्था नाही तर संस्कृती



■ **वृत्तसंस्था, अॅक्रो (घाना), दि. ३ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी घानाच्या संसदेला संबोधित केले. ते म्हणाले, 'आज या प्रतिष्ठित सभागृहाला संबोधित करताना मला अभिमान वाटतो. घानामध्ये असणे हा एक विशेषाधिकार आहे. ही लोकशाहीच्या भावनेने भरलेली भूमी आहे.


मोदी म्हणाले, 'भारत लोकशाहीची जननी आहे. आमच्यासाठी ही व्यवस्था नाही, तर एक परंपरा आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून, भारत हा जगासाठी एक शक्तीस्तंभ आहे. एक मजबूत भारत स्थिर आणि समृद्ध जगाला हातभार लावेल. पंतप्रधान मोदी २ ते १० जुलै दरम्यान परदेश दौऱ्यावर आहेत. या काळात ते ५ देशांना भेट देतील.

दोन्ही देशांनी चार महत्त्वाचे करार (एमओयू) केले. परराष्ट्र मंत्रालयाच्या पातळीवर संयुक्त आयोगाच्या बैठकीची स्थापना करणे, दोन्ही देश पारंपरिक औषध क्षेत्रातील तज्ज्ञांचे प्रशिक्षण आणि अनुभव सामायिक करतील. तिसरा करार सांस्कृतिक उपक्रमांशी संबंधित आहे, जो सांस्कृतिक कार्यक्रम आणि पर्यटनाला प्रोत्साहन देईल. चौथा करार हा मानक सेटिंग (उत्पादने आणि सेवांसाठी गुणवत्ता नियम सेट करणे), ज्यामुळे आर्थिक सहकार्य वाढेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी आफ्रिकन देश घाना येथे पोहोचले. घानाचे राष्ट्राध्यक्ष जॉन महामा यांनी राजधानी अक्रा येथील विमानतळावर त्यांचे स्वागत केले.

## नंबर द्या, बैलजोडी देतो..

### अभिनेता सोनू सूदचा शेतकऱ्याला मदतीचा हात



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
सर्वांच्या मदतीला धावून जाणारा अभिनेता सोनू सूद याने बैलाच्या जागी स्वतःला औताला जुंपणाऱ्या लातूरच्या वृद्ध शेतकऱ्याला मदतीचा हात देऊ केला आहे. त्यांनी या शेतकऱ्याशी संपर्क साधत त्यांना बैलजोडी देण्याची ग्वाही दिली आहे.

लातूर जिल्ह्यात एका ६५ वर्षीय शेतकऱ्याने बैल नसल्यामुळे स्वतःला त्याच्या जागी जुंपल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाल्यानंतर त्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. या पार्श्वभूमीवर अभिनेता सोनू सूद यांनी या शेतकऱ्याला बैलजोडी देण्याची घोषणा केली आहे. आप नंबर भेजिए, हम बैल भेजतें हैं, अशी एका वाक्यातील प्रतिक्रिया सोनूने या प्रकरणी दिली.

सोनू सूदच्या मदतीनंतर स्थानिक प्रशासनही सक्रिय झाले. कृषी विभागाने या शेतकऱ्याला सवलतीच्या दरात उपकरणे पुरवण्याची व ओळखपत्रे बनवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. लातूरचे तालुका कृषी अधिकारी सचिन बावगे यांनी वृद्ध अंबादास पवार यांच्या शेताला भेट दिली.

## शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना कृषिमंत्री बेपत्ता

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज चौथ्या दिवशी काँग्रेस आणि मविआकडून वेगवेगळ्या मुद्यांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारला धारेवर धरण्यात आले.

त्यानंतर, विधानसभेत शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना कृषिमंत्रीच सभागृहात उपस्थित नव्हते. यावरून काही काळासाठी विरोधक आक्रमक झाले होते. कृषिमंत्री आणि सरकारला शेतकऱ्यांच्या विषयाचे गांभिर्य नसल्याचे विरोधक म्हणाले.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी हाके समुद्रात



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर वातावरण आधीच तापलेले असताना, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी गिरगाव चौपाटीवर जलसमाधी आंदोलन छेडले.

महाज्योती योजनेच्या निधीअभावी ओबीसी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात आहे, हे कारण देत हाके यांनी थेट समुद्रात उतरून आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. हाके यांच्यासह विद्यार्थी व कार्यकर्ते थेट समुद्रात उतरले. पोलिसांनी हाके आणि त्यांच्या समर्थकांना ताब्यात घेतले.

# महाराष्ट्रात ३ महिन्यांत ७६७ कुटुंब उद्ध्वस्त

### शेतकरी आत्महत्येवरून राहुल गांधी यांचा निशाणा



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :**
लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला असून यात ते म्हटले की, महाराष्ट्रात अवघ्या ३ महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांनी सरकारला प्रश्नार्थक पद्धतीने विचारले की, हा फक्त एक आकडा आहे का?

राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रात भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर अवघ्या ३ महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.७६७ उध्वस्त घरे आहेत. ७६७ कुटुंबे कधीही सावरू शकणार नाहीत आणि सरकार गप्प आहे. ते दुर्लक्षितपणे पाहत आहे. शेतकरी दररोज कर्जात बुडत आहेत. बियाणे, खते आणि डिझेल महाग आहेत पण सरकारी एमएसपीची हमी नाही. जोपर्यंत शेतकरी कर्जमाफीची मागणी करत नाहीत तोपर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते.

उद्योजकांच्या कर्ज माफीवरून राहुल गांधींनी सरकारवरही निशाणा साधला. राहुल गांधी म्हणाले की, आजच्या बातम्या पहा, अनिल अंबानींचा ४८००० कोटी रुपयांचा एसबीआय घोटाळा. पंतप्रधान मोदी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याबद्दल बोलले होते पण आज परिस्थिती अशी आहे की अन्नदात्याचे आयुष्य अर्धे होत चालले आहे. ही व्यवस्था शांतपणे शेतकऱ्यांना मारत आहे. पण मोदीजी स्वतःच्या जनसंपर्काचा तमाशा पाहत आहेत.

## फक्त उद्धव ठाकरे, पवार यांच्याशीच चर्चा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राज्यात सध्या ठाकरे बंधूंमध्ये एकत्र येण्याच्या तसेच शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट देखील एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली आहे. राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्यास काँग्रेससाठी आघाडी ठेवणं अवघड होईल, काँग्रेस केवळ उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशीच आघाडीबाबत चर्चा करेल. राष्ट्रवादी जर एनडीएसोबत गेली, तर महाराष्ट्रात काँग्रेससाठी त्यांच्यासोबत आघाडी कायम ठेवणे शक्य नाही, हे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, उद्धव आणि राज ठाकरे यांचे एकत्र येणे हा कौटुंबिक मुद्दा आहे. मात्र ते एकत्र आल्यास शिवसेनेच्या पारंपरिक मतांची एकजूट होऊ शकते.

## इंग्रजीचा आग्रह धरणाऱ्यांना ब्रिटनच्या संसदेत पाठवा

### सुधीर मुनगंटीवार विधानसभेत पुन्हा भडकले

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :**
महाराष्ट्रात हिंदी - मराठीच्या मुद्यावरून मोठे वादंग माजले आहे. या प्रकरणी सत्ताधारी व विरोधकांत राजकीय चिखलफेक झाली.

त्यानंतर आज विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत पुन्हा एकदा भाषेचा मुद्दा उपस्थित झाला. पण यावेळी भाषा होती ती म्हणजे इंग्रजी. या प्रकरणी सत्ताधारी भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या इंग्रजी कार्यक्रम पत्रिकेवर तीव्र आक्षेप घेतला.

त्याचे झाले असे की, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रथम मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडील ऊर्जा खात्याच्या कारभारावर तोंडसूख घेतले. त्यानंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित करत कामकाजाची पत्रिका इंग्रजीत छापल्यावर तीव्र आक्षेप नोंदवला.

मुनगंटीवार म्हणाले, ऐकूण तर घ्या ना. पहिल्यापासून आहे म्हणजे? हिंदीच्या सक्तीला विरोध करायचा आणि इंग्रजीवर प्रेम दाखवायचे. इंग्रजीला आलिंगन द्यायचे. हा माझा आक्षेप आहे. इंग्रजीशिवाय समजत नसेल तर पासपोर्ट - व्हिसा काढून अशांना थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा. ही काय पद्धत आहे?, असे ते संताप व्यक्त करताना म्हणाले.

## बिहार निवडणूक स्वबळावर

### केजरीवालांची घोषणा



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :**
आम आदमी पक्ष (आप) बिहारमध्ये स्वबळावर निवडणूक लढवेल. पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी गुरुवारी अहमदाबादमध्ये सांगितले की, इंडिया आघाडी फक्त लोकसभा निवडणुकीसाठी होती. आता आमची कोणाशीही आघाडी नाही.

केजरीवाल गुजरातमध्ये पक्षाच्या सदस्यता मोहिमेला सुरुवात केली. केजरीवाल म्हणाले की, गुजरातच्या विसावदर पोटनिवडणुकीत आम्ही काँग्रेसपासून वेगळे लढलो आणि तिप्पट मतांनी जिंकलो.

## व्यापाऱ्यांच्या मोर्चानंतर मनसेचे भाजपाला थेट आव्हान

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
ठाण्यात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी गुजराती दुकानदाराला मारहाण केली होती. या घटनेचा व्हिडिओ देखील प्रचंड व्हायरल झाला होता.

या घटनेचा तीव्र निषेध करत आज संपूर्ण मीरा भाईंदर मधील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत आपला संताप व्यक्त केला. तसेच या मारहाण केल्यावरून या व्यापाऱ्यांनी मार्च देखील काढला. मात्र, हा मोर्चा व्यापाऱ्यांचा नसून भारतीय जनता पक्षाचा आरोप मनसेने केला आहे. या संदर्भात मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी भाजपविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

प्रकरणात मनसे कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्याला मारहाण करतानाचा व्हिडिओ समोर आला. मात्र, त्या आधी तो व्यापारी काय म्हणाला? ते समोर आलेले नाही. त्या व्यापाऱ्याने मजुरीची भाषा केली, त्यामुळे त्याला आधी हात जोडून विनंती केली. नंतर हात सोडून विनंती केली असल्याचे मनसे नेते संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे. मराठी भाषेचा कोणत्याही प्रकारचा अपमान सहन करणार नसल्याचेही संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे.

मीरा भाईंदर मधील मोर्चा हा व्यापाऱ्यांचा नाही तर भारतीय जनता पक्षाचा असल्याचा आरोप मनसे नेते अविनाश जाधव यांनी केला आहे. मराठी माणसासाठी भाजप कधीच भूमिका घेत नाही. हा मोर्चा निघावा यासाठी सतत पाठपुरावा करणारा भारतीय जनता पक्षाचा कोणता नेता होता? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.

## भारताचा धावांचा डोंगर



शुभमनचे द्विशतक

■ **वृत्तसंस्था, बर्मिंगहॅम, दि. ३ :**
भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन स्टेडियमवर खेळला जात आहे. गुरुवारी सामन्याचा दुसरा दिवस होता.

पहिल्या डावात भारताने ५८७ धावांचा डोंगर उभा केला. कर्णधार शुभमन गिलने द्विशतक झळकावले आहे, हा त्याचा कसोटीतील सर्वोत्तम स्कोअर देखील आहे. याआधी, त्याचा सर्वोत्तम स्कोअर १४७ धावा होता, जो त्याने गेल्या सामन्यात केला होता. गिलचे हे ७ वे कसोटी शतक आहे. इंग्लंडमध्ये द्विशतक झळकावणारा गिल पहिला भारतीय कर्णधार ठरला.

रवींद्र जडेजा ८९ धावा करून बाद झाला. त्याला यष्टिरक्षक जेमी स्मिथच्या गोलंदाजीवर जोश टंगने झेलबाद केले. जडेजाने शुभमनसोबत सहाव्या विकेटसाठी २०३ धावांची भागीदारी केली. इंग्लंडमध्ये सहाव्या विकेटसाठी भारताची ही तिसरी सर्वोच्च भागीदारी आहे.

भारतीय संघाने गुरुवारी ३१०/५ च्या धावसंख्येसह खेळण्यास सुरुवात केली. बुधवारी यशस्वी जैस्वालने ८७ धावा केल्या. ख्रिस वोक्सने २ विकेट घेतल्या. पहिल्या सत्राच्या शेवटी भारताचा स्कोअर ४१९/६ होता. अखेर आज भारताचा डाव ५८७ धावांवर आटोपला. भारत ६०० धावांची संख्या पार करेल, अशी आशा मात्र फोल ठरली.

# दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंना क्लीन चीट

### हत्या व बलात्काराच्या आरोपांना पुरावा नाही, मुंबई पोलिसांचं हायकोर्टात प्रतिज्ञापत्र



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
दिशा सालियन मृत्यू प्रकरणात महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. या प्रकरणात आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांना कोणताही पुरावा आढळलेला नसल्याचं मुंबई पोलिसांनी हायकोर्टात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यामुळे आदित्य ठाकरेंना या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे.

दिशा सालियन हिची हत्या व लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप तिच्या वडिलांनी आणि भाजप आमदार नितेश राणे यांनी केला होता. यासंदर्भात हायकोर्टात याचिकाही दाखल करण्यात आली होती.

मात्र, पोलिसांनी स्पष्ट केलं आहे की, शवविच्छेदन अहवालात दिशाच्या शरीरावर कोणताही लैंगिक किंवा शारीरिक अत्याचार झाल्याचे संकेत नाहीत. तिच्या मृत्यूचे कारण डोक्याला जबर मार लागल्यामुळे झालेलं आहे.

पोलिसांनी हेही नमूद केलं की, दिशा प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्याविरोधात कोणतेही थेट पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या आरोपांना कोणताही कायदेशीर आधार नाही. त्यामुळे या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसंदर्भातील याचिका फेटाळण्याची विनंतीही पोलिसांनी केली आहे.

**आदित्य ठाकरेंवर संशय**

दिशा ही दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर होती, आणि सुशांतच्या मृत्यूनंतर या दोन्ही प्रकरणांना जोडून काही नेत्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर संशय व्यक्त केला होता. मात्र, आता पोलिसांच्या सखोल तपासानंतर त्या आरोपांना अधिकृतरीत्या खोटं ठरवलं गेलं आहे.

# खासगी बस सेवा आजपासून बंद

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३ :

राज्यात ट्रक, टँकरसह प्रवासी आणि माल वाहतूकदार संघटनांनी पुकारलेल्या संपामध्ये आता खासगी लक्झरी बस धारकांनी सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे डिस्ट्रिक्ट लक्झरी बस असोसिएशनने गुरुवारी (दि. 3) मध्यरात्रीपासून संपूर्ण चार्ट (बुकिंग सेवा) बंद ठेवून संपामध्ये सहभागी होण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यव्यापी संपाची व्याप्ती आणखी वाढली असून याचा फटका सर्वसामान्यांना बसणार आहे.

ई-चलनाच्या नावाखाली जबरदस्ती दंडवसुली सुरू असल्याचा आरोप करीत राज्यातील माल व प्रवासी वाहतूकदारांनी आक्रमक भूमिका घेतली असून, 2 जुलैच्या मध्यरात्रीपासून राज्यव्यापी चक्का जाम आंदोलन छेडले आहे. वाहतूकदारांनी सरकारकडे प्रमुख पाच मागण्या केल्या आहेत. या मागण्या मान्य झाल्याशिवाय संप मागे घेतला जाणार नसल्याचे वाहतुकदारांनी स्पष्ट केले आहे.



या आंदोलनाला मुंबईत मोठा प्रतिसाद मिळत असून न्हावा शेवा, पोर्ट प्लाझा या गजबजलेल्या ठिकाणी शुकशुकाट पहायला मिळाला. मुंबईसह राज्यातील इतर भागात देखील संपला प्रतिसाद मिळत आहेत. तर, काही संघटना पुढील काही दिवसांत संपात सहभागी होणार आहेत. पंढरपूरची वारी असल्याने काही संघटनानी उशिरा संपात सहभागी होणार असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, पुण्यातील लक्झरी बस असोसिएशनने गुरुवारी मध्यरात्रीपासून संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत बोलताना असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब खेडेकर म्हणाले की, पार्किंगच्या समस्येचे निराकरण, शहर वाहतूक विभागाकडून होणारी ई-चलन संबंधित कारवाई आणि प्रवासी पिकअप संदभार्तील अडचणी या मुद्द्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही बेमुदत संपाची घोषणा करत आहोत. राज्यव्यापी संपात सहभागी होत आहोत. या निर्णयाची नोंद सर्व लक्झरी बस व्यावसायिक, बस मालक, ऑपरेटर, बुकिंग एजंट आणि संबंधित सभासदांनी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. त्यामुळे आता पुण्यातून खासगी बसने राज्यभरात जाणाऱ्या नागरिकांना फटका सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

> ई चलनाद्वारे बसेसवर होणारी कारवाई आणि अन्य मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आम्ही संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवारी मध्यरात्रीपासून आम्ही संप पुकारणार आहोत. पुण्यातून राज्यभरात जाणारे सुमारे एक हजार बसधारक यात सहभागी होतील.
>
> **बाळासाहेब खेडेकर, अध्यक्ष, पुणे डिस्ट्रिक्ट लक्झरी बस असोसिएशन, पुणे**

## सुरक्षा रक्षकांना द्यावयाच्या लाभाबाबत
### तपासणी मोहीम राबविणार : ॲड.आकाश फुंडकर



**मुंबई :** महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ अंतर्गत, तसेच इतर कामगार कायद्यातील तरतुदीनुसार सुरक्षा रक्षकांना असणारे सर्व लाभ या आस्थापनांनी अदा करणे बंधनकारक आहे. मात्र सुरक्षा मंडळात नोंदीत नसलेल्या आस्थापना खासगी सुरक्षा रक्षकांना लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. आस्थापनांनी खासगी सुरक्षा रक्षकांना द्यावयाच्या लाभाबाबत जिल्हानिहाय तपासणी मोहीम राबविण्यात येईल, असे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. खासगी सुरक्षा रक्षकांच्या हक्काबाबत सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये किशोर जोरगेवार, महेश शिंदे, प्रशांत बंब, सुलभा गायकवाड यांनी सहभाग घेतला. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना कामगार मंत्री फुंडकर म्हणाले, कामगार विभागाचा नवीन आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. लवकरच विभागात भरती करण्यात येणार आहे. कामगार कायद्याअंतर्गत आस्थापनांची नोंदणी करण्यात येते. सुरक्षा मंडळांकडे नोंदीत आस्थापना आहेत. मात्र गृहनिर्माण संस्था सुरक्षा मंडळाकडे नोंदीत नाहीत. त्यामुळे अशा संस्थांकडे खासगी सुरक्षा रक्षकांच्या हक्काबाबत तातडीने तपासणी करण्यात येईल.

## 'कर्करोग निदान व्हॅन'ची निविदा प्रक्रिया राबवून खरेदी : मेघना साकोरे-बोर्डीकर



**मुंबई:** कर्करोगाचे निदान वेळेवर होऊन कर्करुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी राज्यात आठ कर्करोग निदान व्हॅनची खरेदी करण्यात आली आहे. ही खरेदी जेम पोर्टलवर स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवून करण्यात आली आहे. या व्हॅनमध्ये ४४ नग वैद्यकीय उपकरणे असून फर्निचर आणि कस्टमायझेशन यांचा समावेश आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. कर्करोग निदान व्हॅन खरेदी बाबत सदस्य भास्कर जाधव यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या उत्तरात राज्यमंत्री म्हणाल्या, स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवून कमीत कमी दर आलेल्या कंपनीकडून व्हॅन खरेदी करण्यात आल्या आहेत. या खरेदी प्रक्रियेची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी पत्र दिले आहे. त्यानुसार आयुक्त, आरोग्य सेवा यांच्यामार्फत सखोल चौकशी करून अधिवेशन संपण्याच्या आत अहवाल सादर करण्यात येईल.

## वीज पडण्याची पूर्वसूचना देणारे नवीन ॲप विकसित करणार : गिरीश महाजन



**मुंबई :** राज्यात वीज पडून होणारे मृत्यू टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. सध्या ४० किलोमीटर परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना दामिनी व सचेत ॲपद्वारे दिले जात आहे. कमी परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना देणारे नवीन ॲप विकसित करण्यात येईल, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाच्यावेळी दिली. या संदर्भात सदस्य समीर कुणावर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव, संतोष दानवे आणि विजय वडेट्टीवार यांनी सहभाग घेतला. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन म्हणाले, राज्यात पावसाळी वातावरणात वीज पडून होणाऱ्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना याचा सर्वाधिक धोका होत आहे. मुसळधार पावसाबरोबरच वीज कोसळणे आणि वादळी परिस्थिती उद्भवते, यावेळी शेतीकाम करत असताना अनेक वेळा शेतकरी वीज पडण्याच्या दुर्घटनांत बळी पडतात. वीज पडण्याची पूर्वसूचना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचून जीवित हानी टाळता यावी.

## भाजप म्हणजे डरपोक लोकांची डी गँग



**मुंबई :** आजचा भारतीय जनता पक्ष म्हणजे डरपोक लोकांची 'डी गँग' असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. नाशिक मधील उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश होणार आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी भाजप उद्या दाऊद इब्राहिम याला देखील पक्षात प्रवेश देईल, असा आरोप केला. इतकेच नाही तर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केलेल्या आरोपांना देखील त्यांनी प्रत्युत्तर दिली आहे. नाशिक मधील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक आणि महानगर प्रमुख मामा राजवाडे देखील भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या सर्वांवर गुन्हा दाखल झालेला असून अटक होण्याच्या भीतीने ते पोलिसांच्या रेकॉर्डनुसार फरार आहेत. असे फरार आणि डरपोक लोकच भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. तुमच्यावर भ्रष्टाचार, दंगे, बलात्कार असे कोणते गुन्हे दाखल असेल तरच तुम्हाला भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश दिला जातो, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

## बालसुधारगृहातील मुलींचे पलायन प्रकरण
### चौकशीसाठी समिती गठीत : आदिती तटकरे



**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर शहरातील एका बालसुधारगृहातील नऊ मुलींनी गच्चीवरून उड्या मारून पलायन केल्याची घटना ३० जून २०२५ रोजी घडली. या प्रकरणी चौकशीसाठी समिती गठीत करण्यात आली असून समितीचा अहवाल सात दिवसात येणार असून हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. विधान परिषदेत उपस्थित करण्यात आलेल्या औचित्य च्या मुद्द्यावर निवेदन करताना मंत्री तटकरे बोलत होत्या. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बालकल्याण समिती व इतर अधिकाऱ्यांनी १ जुलै रोजी संस्थेला भेट देत चौकशी केली. तीन मुलींनी निवास कक्षात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर आक्षेप घेत गोंधळ घातला होता. त्यानंतर बालगृहातील नऊ मुलींनी पलायनाचा प्रयत्न केला. या प्रकारानंतर सात मुलींना पोलीस व दामिनी पथकाच्या मदतीने ताब्यात घेतले, दोन मुली पळून गेल्या होत्या. त्यापैकी एक मुलगी सापडली असून एक मुलगी अद्यापही फरार आहे. पाच मुलींना पालकांच्या ताब्यात देण्यात आले असून, इतर तीन मुलींना इतर बालगृहात स्थलांतरित करण्यात आले आहे.

# राज्यातील विनाअनुदानित शाळांना
## टप्प्याटप्प्याने अनुदान : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३ :



राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, 2009 नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. 2016, 2018 आणि नंतर 2023 पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी 10 ऑक्टोबर 2024 रोजी बैठक घेण्यात आली आणि 14 ऑक्टोबर 2024 रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, ज. मो. अभ्यंकर, जयंत आसगावकर, राजेश राठोड यांनी सहभाग घेतला.


## जुनी वाहने एचएसआरपी पाटीसाठी अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२५

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

शासनाने १ एप्रिल, २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविणे बंधनकारक केले आहे. याअंतर्गत अशा वाहनांना यापूर्वी ३० जून २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, वाहनधारकांकडून अल्प प्रतिसाद मिळाल्याने ही अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे, असे सह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. वाहनधारकांनी परिवहन विभागाच्या या संकेतस्थळावर जाऊन एचएसआरपी पाटीसाठी वेळ घेणे आवश्यक आहे.

ही वेळ १५ ऑगस्ट २०२५ पूर्वी घेतल्यास संबंधित वाहनावर कोणतीही कारवाई होणार नाही. यानंतर देखील एचएसआरपी पाटी बसवलेली नसलेली वाहने वायुवेग पथकांच्या तपासणीदरम्यान आढळल्यास संबंधित वाहनचालकांवर नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे, असे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. वाहनधारकांनी मुदतीच्या आत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी प्रसिद्धी पत्रकानव्ये केले आहे.

# शिवभोजन थाळी योजनेत भ्रष्टाचार



■ महासागर प्रतिनिधी
बीड, दि. ३ :

बीड जिल्ह्यातील शिवभोजन थाळी योजनेच्या नावाखाली एक गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राज्य सरकारकडून गरजू नागरिकांसाठी चालवली जाणारी शिवभोजन थाळी योजना ही कमी दरात जेवण देण्याचा उपक्रम आहे. मात्र, याच योजनेचा गैरवापर करत अनुदान मिळवण्यासाठी फसवणुकीचा प्रकार उघड झाला आहे. शिवभोजन थाळीच्या घोटाळ्याचा व्हिडिओ समोर आला आहे.

बीडमधील शासकीय विश्रामगृहाजवळ असलेल्या उडपी हॉटेलमध्ये एकाच थाळीसमोर जवळपास ५० जणांना बसवून फोटो काढण्यात आले. या फोटोंचा उपयोग करून अधिक थाळ्यांची नोंद करून सरकारकडून अधिक अनुदान मिळवण्याचा प्रयत्न यांच्याकडून होत आहे. या प्रकरणाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

### अनुदान लाटण्यासाठी एकाच थाळीसमोर ५० जणांचे फोटो

**शिवभोजन योजना काय?**

महाराष्ट्र सरकारने 01 जानेवारी, 2020 रोजी एक निर्णय घेतला. त्यानुसार राज्यातल्या राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन सुरू करण्यात आले. या योजनेला शिवभोजन थाळी असे म्हटले जाते. 26 जानेवारी 2020 पासून ही योजना सुरू झाली. या शिवभोजन थाळीमध्ये 2 चपात्या, 1 वाटी भाजी, 1 वाटी वरण व 1 मूद भात देण्यात येतो. ही योजना सुरू करण्यासाठी शिवभोजन नावाचे ॲपही तयार करण्यात आले. शिवभोजन थाळ्या वितरित करण्यापूर्वी लाभार्थी व्यक्तीचा फोटो घेणे बंधनकारक आहे. मात्र, फोन नंबर घेणे ऐच्छिक आहे. केंद्रचालक ॲपवर शिवभोजन थाळी योजनेचा मेन्यू प्रसिद्ध करू शकतो. संबंधित केंद्राच्या बाहेरही बोर्डवर तो लावला जातो. शिवभोजन योजना सुरू झाल्यापासून 27 मार्च 2024 पर्यंत एकूण 18,83,96,254 शिवभोजन थाळ्या लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## मनपाने मुंबईतील कबूतरखान्यांबाबत विशेष अभियान राबवावे : उदय सामंत



**मुंबई :** सध्या मुंबई महापालिकेच्या हद्दीत ५१ कबूतरखाने आहेत. या ठिकाणी कबूतरांमुळे श्वसनविकार, दुर्गंधी व प्रदूषण वाढत असून, यावर नियंत्रण आवश्यक आहे. त्यादृष्टीने कबूतर खाण्यांबाबत तातडीने विशेष ड्राईव्ह घेण्याबाबत मुंबई महापालिकेला आदेश देण्यात येतील असे मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. यावेळी सदस्य चित्रा वाघ यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. मुंबईतील कबूतरखाने आणि त्यामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक त्रासाबाबत मंत्री सामंत यांनी विधानपरिषदेत माहिती दिली. काही कबूतरखाने न्यायालयाच्या आदेशानुसार बंद करण्यात आले होते कबूतरखाने पुन्हा सुरू झाल्याचे निदर्शनास आले.

# आणि, पुन्हा मंगलाष्टके गुंजली



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३ :

नवी मुंबईतील सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघ हा एक क्रियाशील संघ म्हणून ओळखला जातो. या संघाच्या सभागृहाला काल मात्र एखाद्या लग्न सोहळ्याचेच स्वरूप प्राप्त झाले होते. याला कारण घडले ते म्हणजे संघाचे सदस्य श्री कारभारी जाधव यांच्या लग्नाला ५० वर्षे झाली म्हणून त्यांचा सपत्नीक ,केवळ औपचारिक सत्कार न करता, दोघांनी एकमेकांच्या गळ्यात घालण्यासाठी भारदस्त वरमाला आणण्यात आल्या होत्या. दोघेही एकमेकांना वरमाला घालणार, तितक्यात संघाचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ कलाकार राम काजरोळकर यांच्यातील कलाकार जागा झाला आणि त्यांनी सर्वांना थांबवून मी मंगलाष्टके म्हणतो, मग त्यांना वरमाला घालू द्या,असे सांगितले आणि लगेच स्वतःच्या सुरेल आवाजात मंगलाष्टके सुरू केली. क्षणात सर्व वातावरण लग्नमय झाले. मंगलाष्टके संपताच कारभारी जाधव आणि त्यांच्या पत्नीने एकमेकांना वरमाला घालताच टाळ्यांच्या कडकडाटात होऊन एकच जल्लोष झाला.

उपस्थित सर्वांनाच जणू आपण खरोखरच्या लग्नाला आल्याचा आनंद मिळाला. या लग्न सोहळ्यापूर्वी, जून महिन्यात वाढदिवस असलेल्या ३०९ जणांचे वाढदिवस साजरे करण्यात आले.काही सदस्य येऊ न शकल्याने त्यांची नावे घेऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

बुद्धिबळ आणि कॅरम मध्ये राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल श्री रमेश मोहिते, गायन व नाट्य स्पर्धेत पारितोषिक मिळाल्याबद्दल व चंद्रप्रभा चंद्रकांत पारपिल्लेवार, एकांकिका वाचन व गायन कलेत पारितोषिक मिळाल्याबद्दल शिंदे यांना गौरविण्यात आले. या संघाच्या आणि संघाच्या सदस्यांच्या लौकिकात भर घालण्याचे काम सातत्याने करीत असल्याबद्दल संघाचे सदस्य सर्वश्री देवेंद्र भुजबळ आणि मारुती विश्वासराव यांचाही या वेळी शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना संघाचे अध्यक्ष मारुती कदम यांनी सर्व सत्कार मूर्तींचे कौतुक केले. विशेषतः सर्वश्री देवेंद्र भुजबळ आणि मारुती विश्वासराव या दोन्ही व्यक्ती कुणी काही सांगितले नाही, तरी संघाच्या आणि संघाच्या सदस्यांच्या चांगल्या उपक्रमांची स्वतःहून दखल घेतात आणि त्यांची चांगली प्रसिद्धी करतात. त्यामुळे सानपाडा जेष्ठ नागरिक संघाची ओळख केवळ सानपाडा किंवा नवी मुंबई पुरतीच मर्यादित राहिली नसून ती संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली आहे,असे गौरवोद्गार काढूले.

## कम्प्युटर इंजिनिअर तरुणीवर सामूहिक बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ३ :

पुणे शहरातील कोंढवा परिसरात बोपदेव घाटात एका तरुणीवर सामूहिक बलात्कार घटना घडल्याने खळबळ उडाली होता. आता पुन्हा एकदा कोंढवामध्ये एक उच्चभ्रू सोसायटीत धक्कादायक घटना घडली आहे. कुरिअर डिलिव्हरी बॉय असल्याचे सांगत घरात शिरलेल्या एका 22 वर्षीय तरुणाने कम्प्युटर इंजिनिअर तरुणीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पसार झालेल्या आरोपीचा माग काढण्यासाठी पोलिसांनी दहा पथकांच्या माध्यमातून तपास सुरू केला आहे.

याप्रकरणी एका 22 वर्षीय तरुणीने कोंढवा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या तक्रारीनुसार, एका 28 ते 30 वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता मूळ अकोलाची रहिवासी असून मागील दोन वर्षांपासून पुण्यात राहते. तरुणी कल्याणीनगर येथे खासगी कंपनीत नोकरीला आहे. कोंढव्यातील एका उच्चभ्रू सोसायटीत तिच्या भावासोबत ती वास्तव्यास आहे. तरुणीचा तिचा भाऊ परगावी कामानिमित्त गेला होता. बुधवारी (2 जुलै) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास तरुणी घरात एकटीच होती. त्यावेळी आरोपी फ्लॅट जवळ दारात आला आणि त्याने दरवाजा वाजविला. तरुणीने घराचे सेफ्टी डोअर उघडले. तेव्हा त्याने कुरिअर कंपनीतील कामगार असल्याचे सांगितले आणि बँकेचे कुरिअर आहे असे सांगितले.तरुणीने त्याला कुरिअर माझे नसल्याचे सांगितले. त्यावेळी त्याने कुरिअर कागदपत्रांवर स्वाक्षरी करावी लागेल, असे तिला सांगितले आणि दरवाजा उघडण्यास भाग पाडले.

तरुणीला बोलण्यात गुंतवून आरोपीने तिच्या चेहऱ्यावर अचानक स्प्रे मारला. स्प्रे मारल्यानंतर तिचे डोळे जळजळले त्यानंतर आरोपी तरुण घरात बळजबरीने शिरला. त्याने तरुणीला धमकावून तिच्यावर बलात्कार केला. पसार झालेल्या आरोपीने मोबाइलमध्ये तरुणीचे आक्षेपार्ह छायाचित्र काढले आहेत. मी परत येईल, असा मेसेज देखील मोबाइलमध्ये लिहिला आहे, असे पीडित तरुणीने फियार्दीत सांगितले आहे. त्यानंतर परिमंडळ पाचचे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, कोढवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनय पाटणकर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

### १२ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये
## ई डिजिटल ग्रंथालय

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३ :

राज्यातील वाढती शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व महाविद्यालयांमधील विद्यार्थी संख्या विचारात घेता संबंधित संस्था व त्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक स्वरूपाची व नाविन्यपूर्व शिक्षण पद्धती उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्यामध्ये गतवर्षी सुरू करण्यात आलेल्या १० वैद्यकीय महाविद्यालयांसह १२ महाविद्यालयांमध्ये ई डिजिटल ग्रंथालय उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी आशियाई विकास बँकेकडून मिळणाऱ्या योजनाआधारित कर्जाच्या मंजूर अनुदानातून ४७ कोटी १२ लाख ४२ रुपये निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील अनेक पाठ्यपुस्तके, जर्नल्स, मॅगजीन, शोधनिबंध, वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित साहित्य यांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये साहित्य संपदा उपलब्ध करून देण्यास सरकारला अडचणी येत आहेत. तसेच महाविद्यालयांमध्ये उपलब्ध मुद्रित पुस्तकांची संख्या कमी असल्याने एकाच वेळी ती सर्व विद्यार्थ्यांना वापरता येत नाहीत.

# तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक गजानन कोटलावार यांना सेवेतून बडतर्फ करा

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ३ :

गजानन कोटलावार हे माहे ऑक्टोबर २०२० पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.प्रादेशिक कार्यालय गडचिरोली येथे प्रादेशिक व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते.

दरम्यान गडचिरोली जिल्हा अंतर्गत दि.२१ नोव्हेंबर २०२२ ते दि.७ ऑगस्ट २०२३ या कालावधीत धान भरडाई प्रक्रियेमध्ये होत असलेली अनियमितता तसेच गैरप्रकारा संदर्भात व्यवस्थापकीय संचालक मुख्य कार्यालय नाशिक यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्याकरिता व्यवस्थापकीय संचालक मुख्य कार्यालय नाशिक यांनी त्यांचे दि.११ जुलै २०२३ चे कार्यालयीन आदेश अन्वये महाव्यवस्थापक (विपणन) मुख्य कार्यालय नाशिक यांचे अधिपत्याखाली नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने प्रकरणाचे अनुषंगाने चौकशी करून व्यवस्थापकीय संचालक मुख्य कार्यालय नाशिक यांना सविस्तर चौकशी अहवाल सादर केला असता कोटलावार यांनी प्रचंड गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले असल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली असल्याने संबंधित विभागात एकच खळबळ माजली आहे.

आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय गडचिरोलीचे तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक गजानन कोटलावार यांनी गडचिरोली जिल्हा अंतर्गत हंगाम २०२२-२३ मध्ये धान भरडाई करीता एकुण ४१ राईसमिल धारकांना करारबद्ध केले होते.

सदर प्रक्रियेमधील अनियमितता तसेच झालेल्या गैरप्रकारा संदर्भात चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक गजानन कोटलावार यांचेवर धान भरडाई संबंधात कायदेशीर प्रक्रिया राबविण्याकरीता प्रादेशिक व्यवस्थापक या नात्याने जबाबदारी सोपविण्यात आली असतांना धान भरडाई तसेच राईस फोर्टीफिकेशन बाबत महाराष्ट्र शासन अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन परिपत्रक क्रमांक धानभ-१२२२/प्र.क्र १९३/नापु २९ मंत्रालय मुंबई दि.२१ नोव्हेंबर २०२२ अन्वये निर्गमित शासन परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन करून धान भरडाई मध्ये अनियमितता व गैरव्यवहाराच्या बाबी निष्पन्न झाल्या आहेत.

यात राईसमिल कडून प्राप्त बँक गॅरेंटी/टिडीआर/एफडीआर शासन निर्णयातील तरतुदीनुसार बँकांकडून पडताळणी न करणे, आवश्यक असतांना त्यांनी शासन निर्णय १२ बी चे तरतुदीचे उल्लंघन करून एकुण १८ वेगवेगळे करारबद्ध मिल्सची यादी प्रमाणे बँक पडताळणी केलेली नाही.राईसमिल्स कडुन प्राप्त बँक गॅरेंटी टीडीआर/एफडीआर शासन निर्णयातील तरतुदीनुसार एक वर्ष कालावधीची घेणे अनिवार्य असतांना सुद्धा त्यांनी शासन निर्णय तरतुदीचे उल्लंघन करून एकुण १८ वेगवेगळ्या राईसमिल्सची अल्पकालावधिची बँक गॅरन्टी घेतलेली आहे.राईसमिल्स कडुन प्राप्त बँक गॅरन्टी टीडीआर/एफडीआर शासन निर्णयातील तरतुदीनुसार हिशोब पुर्ण न होताच परत केले असून त्यांनी शासन निर्णय तरतुदीचे उल्लंघन करून एकुण १० राईसमिल्स यांचे भातभरडाईचे व्यवहार पूर्ण होण्याआधी बँक गॅरन्टी परत केली आहे.

काही राईसमिल्स कडून प्राप्त बँक गॅरन्टी टीडीआर/एफडीआर तक्रारी झाल्यावर व चौकशी सुरु झाल्यावर घेण्यात आलेले असून शासन निर्णय तरतुदीचे उल्लंघन करून एकुण १३ राईसमिल्स यांची चौकशी सुरु झाल्यानंतर बँक गॅरन्टी घेतलेली आहे. काही राईसमिल्स कडुन ती शासन निर्णयातील तरतुदीनुसार राष्ट्रीयकृत किंवा सेड्युल बँकेची घेतलेली नसुन ती अनाधिकृत घेण्यात येऊन त्या आधारे धान भरडाईस दिला असून शासन निर्णय तरतुदीनुसार उल्लंघन करून एकुण ४ राईसमिल्स यांची राष्ट्रीयकृत बँक गॅरन्टी न घेता सहकारी बँकेची बँक गॅरन्टी घेऊन वितरण आदेश दिलेला आहे.काही राईसमिल्स कडुन प्राप्त बँक गॅरन्टीच्या रकमेपेक्षा जास्त किंमतीचे धान भरडाईस दिलेले असुन १९ राईसमिल्स यांची बँक गॅरन्टीचे प्रमाणात वितरण आदेश न दिलेल्या बँक गॅरन्टी पेक्षा जादा वितरण आदेश दिलेले आहेत. नियमित वितरण आदेशाकरीता व सामाईक ताब्याकरीता स्वतंत्र बँक गॅरन्टी व अनामत रक्कम न घेता धानाचे वितरण आदेश दिलेले असून भरडाईचे शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ५.२१.३ नुसार तसेच ५.२१.४ नुसार तरतुदीचे उल्लंघन करून नियमित वितरण आदेश व सामाईक ताब्याकरीता स्वतंत्र बँक गॅरन्टी व अनामत रक्कम न घेतलेले एकुण २५ राईसमिल आहेत.

शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ३

## शाळाबाह्य मुले शोध मोहिमेस सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै** : केंद्र आणि राज्य शासन बालकांच्या नियमित शिक्षणासाठी तसेच बालके शाळाबाह्य होऊ नयेत यासाठी प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी १ ते १५ जुलै २०२५ या कालावधीत शोध मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, महानगरपालिका, नगर पालिका / पंचायत यांचे नोडल अधिकारी नियुक्त केले आहे.

## उद्योग विभागाचा घेतला आढावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै** : जिल्ह्यात उद्योगांना चालना देणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे तसेच 'एक जिल्हा एक उत्पादन' अंतर्गत निर्यात धोरण निश्चित करणे आदी बाबी संदर्भात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाचा आढावा घेण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्या, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा यांच्यासह विविध उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# हॉफ मर्डर करणाऱ्या मोकाट आरोपींकडून पिडीताला जिवे मारण्याची धमकी

### पिडीत तक्रारकर्त्यांना पोलिसांकडून आरोपी प्रमाणे वागणूक, पोलिस प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचीन्ह

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै** : प्राणघातक हल्ला करणाऱ्या मोकाट आरोपी आणि त्याचे साथीदार अजूनही परिसरात उघडपणे फिरत आहेत. आरोपींकडून जीवाला धोका असल्याची माहिती रामनगर पोलिसांना देऊनही, आरोपींवर कारवाई करण्यास दिरंगाई करत आहेत. आरोपींच्या भीतीमुळे कुटुंब-ातील सदस्यांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. भविष्यात जी-वाला धोका निर्माण झाल्यास पोलिस प्रशासन आणि मुख्य आरोपी आणि सहकारी जबाबदार असतील. या संदर्भात पीडित जगदीश बिस्वास यांनी त्यांच्या पत्नीसह पत्रकार परिषदेद्वारे पोलिस प्रशासनाकडे या प्रकरणाचा तपास एलसीबीकडे सोपवावा आणि आरोपींना अटक करावी अशी मागणी केली आहे.

पीडित जगदीश यांनी सांगितले की, तो मजूर म्हणून काम करतो. ११ जून रोजी बंगाली कॅम्प परिसरातील शाम नगर भगतसिंग चौकात किरकोळ वादातून आरोपी राजू ढाली आणि त्याच्या तीन साथीदारांनी दारूच्या नशेत त्याच्या गळ्यावर आणि हातावर वस्तरा ने हल्ला केला. त्यानंतर त्याला १३ जूनपर्यंत सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यादरम्यान त्याची पत्नी ज्योती बिस्वास यांनी रामनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीत चार आरोपी राजू ढाली उर्फ राजू बिल्डर, रॉबिन बिस्वास, प्रकाश अधिकारी आणि सुबल मंडल यांची नावे होती. परंतु पोलिसांनी फक्त एकाच आरोपी राजू ढालीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीची एफआयआर कापी देण्यास पोलिसांनी नकार दिला. इतर तीन जणांना या प्रकरणापासून दूर ठेवण्यात येत आहे.



या संदर्भात एसपींना भेटल्यानंतर तपास अधिकारी पीएसआय बागडे यांना चौकशीचे आदेश देण्यात आले. परंतु आतापर्यंत तपास पुढे सरकला नाही आणि आरोपींना अटकही करण्यात आलेली नाही. आमदार सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री डॉ. उईके यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांकडून साक्षीदारांवर दबाव आणला जात आहे. जगदीश बिस्वास यांनी रामनगर पीएसआय बागडे यांच्यावर आरोपींना वाचवण्यासाठी आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप केला आहे. पोलीस राजू ढालीला आरोपी दाखवून वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. मुख्य आरोपी आणि इतर ३ जण खुलेआम चाकू घेऊन परिसरात फिरत असल्याचा आरोपही करण्यात आला. आरोपींच्या भीतीमुळे पत्नी आणि मुलांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.

भविष्यात राजू ढाली आणि त्याच्या ३ सहकाऱ्यांकडून जीवाला धोका आहे आणि जीवाचे बरे वाईट झाल्यास पीएसआय बागडे, पोलिस प्रशासन आणि आरोपी यासाठी जबाबदार असतील. या प्रकरणाचा तपास एलसीबीकडे सोपवून आरोपींना अटक करण्याची मागणी पीडित जगदीश बिस्वास यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे. पत्रकार परिषदेत जगदीश बिस्वास आणि ज्योती बिस्वास उपस्थित होते.

### घुग्घुस शहरात मच्छर, किटकाच्या प्रमाणात वाढ

# नगर परिषदेने फवारणी करण्याची संत श्री. साईबाबा बहुउद्देशीय संस्थेची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ३ जुलै** : सात जून २०२५ पासून पावसाळा सुरू झाला आहे त्यामुळे परिसरात नाल्या डबके खड्डे हे पाण्याने तुडूंब भरले आहे. सध्या परिसरात ठिक ठिकाणी कचरा व घाण जमा झाली आहे. त्यामुळे ठिक ठिकाणी दुर्गंधी पसरत आहे नागरिक सुद्धा त्रस्त झाले आहे या कचऱ्यामुळे व पाण्यामुळे येथील नागरिकाला डेंगूचे व कीटकाचे प्रमाण वाढत आहे त्याकरिता २ जुलै रोजी संत श्री साईबाबा बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने व नागरिकांच्या वतीने घुग्घूस नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यामध्ये संस्थेचे अध्यक्ष गणेश शेंडे उपाध्यक्ष गणेश वझे सचिव पंकज बावणे कोशाध्यक्ष शंकर कामतवार सचिन बोंडे या सर्वांनी प्रशासनाला निवेदन दिले व सूचना केली की पावसाळा सुरू असल्यामुळे या परिसरात भविष्यात कोणतीही मोठी बिमारी किंवा आजार होऊ शकतो त्यासाठी डेंगू मलेरिया कीटकांचे प्रमाण वाढल्यामुळे परिसरात राहणाऱ्या नागरिकांना सुद्धा त्रास होत आहे.

त्यामुळे या परिसरात जंतू नाशक पावडर नाल्यांमध्ये व डबक्यात टाकावेत व ठिकठिकाणी जंतू नाशक फवारणी यंत्राद्वारे फवारणी करण्यात यावी जेणेकरून पावसाच्या कुठल्याही बिमारीला येतील नागरिकांना सामोरे जावे लागणार नाही व परिसर सुद्धा स्वच्छ करण्यात यावा अशी येथील समस्त नागरिकांतर्फे व संत श्री साईबाबा बहुउद्देशीय संस्था तर्फे नगरपरिषद प्रशासनाला पत्र देऊन विनंती करण्यात आली.

# बळजबरीने जेसीबीने मुख्य मार्गावरील शेडची तोडफोड

### गोंडपिपरीतील घटना चौघांवर गुन्हे दाखल



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**गोंडपिपरी, दि. ३ जुलै** : गोंडपिपरी येथील गुजरी समोरील परिसरातील आनंदराव गोविंदा झाडे यांच्या मुख्य मार्गावरील मालकीच्या जागेवर तयार करण्यात येत असलेला मोठा शेड जेसीबीने पुर्णपणे पाडण्यात आला.

याचसोबत झाडे यांनी अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. भरदूपारी हा प्रकार घडल्यानंतर आनंदराव झाडे यांनी या प्रकाराची गोंडपिपरी पोलीसात तक्रार दाखल केली.पोलीसांनी याप्रकरणी चौघांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

गोंडपिपरी येथील आंनदराव उर्फ अनिल गोविंदा झाडे हे राजुरा नागरी सह.पतसंस्था येथे आरडी एजन्ट म्हणून कार्यरत आहेत. गोंडपिपरीत गुजरी-समोरील प्रमुख मार्गावर त्यांच्या मालकीची जागा आहे.याठिकाणी त्यांनी शेड उभारले होते. दिं.१ जुलै दुपारच्या सुमारास काही लोकांनी जेसीबीच्या सहायाने त्याचे शेड पुर्णपणे उध्वस्त केले.या घटनेची माहिती मिळताच झाडे तिथे पोहलचे.त्यांनी माझा शेड का पाडत आहात अशी विचारणा केली असता त्यांना अश्लील शिवीगाड करित जिवे मारण्याची धमकी दिली.हा प्रकार घडल्यानंतर अनिल झाडे यांनी याप्रकरची तक्रार गोंडपिपरी पोलीसात दाखल केली.याप्रकरणी पोलीसांनी बळवंत विनायक ठाकरे,राजुरा, कार्तिक सोमलकर,राजुरा,अभिजीत बोरकुटे, राजुरा व विकी विजय ठाकुर गोंडपिपरी या चौघांविरोधात विविध गुन्हे दाखल केले.या संपूर्ण प्रकारामुळे अनिल झाडे यांचे एक लाख विस हजार रूपयाचे नुकसान झाले आहे.

दरम्यान शेड पाडण्यात आलेली जेसीबी पोलीसांनी ताब्यात घेतली आहे.भरदिवसा अशी दादागिरी करण्याच्या या प्रकाराने आता संताप व्यक्त करण्यात येत आहे.

**कौटुंबिक वादाची किनार**

गोंडपिपरी येथील अनील झाडे व किशोर झाडे यांचे वडीलोपार्जीत जागेची वाटणी चाळीस वर्षापुर्वी झाली होती.यानुसार किशोर झाडे यांच्या वडिलांना अकरा एकर शेतीची जागा व अनील झाडे यांच्या घरामागील जागा देण्यात आली.तर अनिल झाडे यांच्या वडिलांना दिड एकर शेतीची जागा व रोडलगत असलेली घराची जागा हिस्सेवाटणीत देण्यात आली.असे असतांना रस्त्याच्या मुददयावरून किशोर झाडे यांनी तालुका न्यायालयात प्रकरण दाखल केले होते.पण न्यायालयाने दावा नामंजुर करित अनील झाडे यांच्या बाजुने निकाल दिला होता.आता याच मुद्यावरून शेड पाडण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# भद्रावतीच्या रस्त्यावर मुजोर बुलेट चालकांचा धुमाकूळ

### भद्रावती वाहतूक पोलीस यंत्रणेचा दबाव का पडतो अपुरा, जनतेतुन थेट होत आहे सवाल



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ जुलै** : शहरात रायल एन्फ़िल्ड या कंपनीची बुलेट हि दुचाकी शहरात रस्त्यावर ५० ते ६० या वेगाने धावत धूम करत आहे. रस्त्यावरचे गतिरोधक असो वा एखादी मध्यंतरी रस्ता ओलांडतांना, किंवा एखादी रस्त्यावरचे बसलेले जनावर. मात्र बुलेटचा वेग हा कायमच जोरात दिसतो. वाहतूक विभागाने दिलेल्या वेगाला आवरा आणि जीवाला सावरा या सूचनेचे पालन भद्रावती शहरत होताना दिसतच नाही. अपघाताला निमंत्रण देणारी हि अल्पवयीन बुलेट चालक आपला जीव धोक्यात आणून दुसऱ्याच्या जीव गमावणार असल्याचे दिसत आहे. यात भद्रावती वाहतूक पोलीस यंत्रणेचा दबाव निर्माण होत नसून तो अपुरा का पडत आहे ? असा थेट सवाल आता जनतेतून उठत आहे.

शहरात रस्त्यावर भरघाव वेगाने धावणारी हि अल्पवयीन बुलेट चालक आपला वेग नियंत्रित करणार का ? ५० ते ६० या वेगाला नियंत्रित करून कारवाई ला सामोरे जाऊन आता जिल्हा पोलीस विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. याकडे भद्रावती शहरवासियांचे लक्ष वेधून धरले आहे.

# मनपातर्फे डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम ( कंटेनर सर्वे ) सुरु

### ब्रिडींग चेकर्स करणार घरांची तपासणी, नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै** : मनपा आरोग्य विभागामार्फत संभाव्य डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांच्या प्रतिबंधासाठी डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम राबविण्यात येत असुन या अंतर्गत आरोग्य चमु शहरातल्या प्रत्येक घरांची तपासणी करणार असल्याने घरी येणाऱ्या ब्रिडींग चेकर्सना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



पावसाळा सुरु होताच डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांचा प्रसार होण्यास सुरवात होते. पावसात मोकळे भूखंड, बंद घराची छते, चालु बांधकामाची ठिकाणे, घरी वापर नसलेली ठिकाणे,घरातील कूलर, टायर, कुंड्या खालील प्लेट,फ्रीज खालील ट्रे,पाण्याचे ड्रम, फिश टँक, एसीचे पाणी पडणारे कंटेनर, भंगारातील वस्तु,डबे इत्यादी ठिकाणी पाणी साचुन राहते व याच जागा डासांची उगमस्थाने बनतात. या उगमस्थानांचा शोध घेऊन ती नष्ट करणे व नागरीकांना सचेत करणे यासाठी आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात डॉ. नयना उत्तरवार यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात २८ ब्रिडींग चेकर्स,३२ एएनएम, २२ एमपीडब्लु व १७० आशा वर्कर तसेच स्वच्छता निरीक्षक यांच्याद्वारे डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे.

डेंग्यु डास हा स्वच्छ व साचलेल्या पाण्यात आढळतो त्यामुळे आपल्या घराची स्वतपासणी करणे देखील आवश्यक आहे.प्रत्येकाने आपल्या घरातील पाणी साठवण्याची भांडी आठवड्यातून एकदा कोरडी करून,पुसून वाळवणे आवश्यक आहे जेणेकरून डास अंडी निर्माण होणार नाही. डासाअळी आढळल्यास अबेट द्रावण टाकणे, पाणी साठा मोठा असले तर त्यात गप्पी मासे टाकणे आवश्यक आहे. गप्पी मासे पाण्यातील डासांची अंडी खाऊन टाकतात ज्याने डासांचा प्रादुर्भाव कमी होतो. डेंग्यु डासाची उत्पत्ती टाळणे आवश्यक असल्याने आठवड्यातून एक दिवस हा कोरडा दिवस पाळावा.

लक्षणे - डासांमुळे पसरणाऱ्या आजारांमध्ये डेंग्यूताप व डेंग्यू रक्तस्त्रावी ताप हे मुख्य आजार आहेत. ताप येणे, अंगावर पुरळ येणे, डोळ्याच्या खोबणीमधे दुखणे, पाठदुखी, डोकेदुखी, स्नायूमध्ये वेदना, सांधेदुखी ही डेंग्यूची प्रमुख लक्षणे आहेत.ताप आल्यास वैद्यकीय सल्ला शिवाय कुठलीही औषधे घेऊ नये. वस्तुतः डेंग्यू हा सामान्य आजार आहे परंतु सर्वसामान्यांना या रोगाबाबत माहिती नसल्याने किंवा अपुरी माहिती असल्याने काही वेळा तो जीवघेणा ठरू शकतो. म्हणून प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेद्वारे याबाबत नागरिकांना वारंवार माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे. संभाव्य डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांच्या प्रतिबंधास पुढील काही दिवस महत्वाचे आहेत. प्रत्येक घरातील एका व्यक्तीने दररोज फक्त दहा मिनिटे पुढील दहा आठवडे घराची पाणी साचलेले सर्व कंटेनर यांची स्व तपासणी केल्यास निश्चितच डेंग्यू आजारापासून बचाव होऊ शकतो. आधी ज्या घरांमध्ये रुग्ण आढळले होते ते व संभाव्य दुषित घरे यावर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

# रेल्वेच्या अवजड वाहतुकीचा उद्रेक

### वॉर्ड वासियांची पायबंद घालण्याची मागणी



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ जुलै** : गणपती वॉर्ड गवराळा येथील अहिल्यादेवी होळकर चौक ते टी पॉईंटकडे जाणारा रस्ता तसेच याच रस्त्यावरून रेल्वे ठेकेदाराच्या दिवसरात्र होणारी अवजड वाहतूक यामुळे स्वराज नगर व अहिल्यादेवी होळकर चौक परिसरातील नागरिक हैराण झाले असून आज ३ जुलै रोजी मर्यादेपेक्षा अधिक लोखंडी साहित्य भरलेला ट्रक उलटून खाली झाला. सुदैवाने जीवितहानी टळली मात्र या मार्गावरून ढोरवासा, चिरादेवी पिंपरी सुमठाणा येथील नागरिक व बहुसंख्य विद्यार्थी जाणे येणे करतात. या अवजड व अवैध वाहतूकीस पायबंद घालावा अथवा रस्ता रुंदीकरण करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील मनीष बूच्चे, निलेश टोंगे, अक्षय आस्कर, अक्षय दुर्गे, प्रतीक वरखडे, शुभम आसमपल्लीवर, गणेश पचारे आदींनी रेल्वे प्रशासन, व नगर परिषद भद्रावती कडे केली आहे.

# सर्वांच्या सहकार्याने सण उत्सव शांततेत पार पाडू या !

### अपर जिल्हाधिका-यांचे जिल्हा शांतता समितीमध्ये आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै** : आगामी दोन – तीन दिवसांत जिल्ह्यात आषाढी एकादशी आणि मोहर्रम तसेच पुढील महिन्यांपासून गणेशोत्सव व इतर सणांना सुरवात होणार आहे. या दरम्यान जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच सर्वधर्मीय सण शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाला आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांनी केले.

नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, सहायक पोलिस अधिक्षक नियोमी साटम, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे उपस्थित होते.

प्रत्येकच नागरिक हा विना वर्दीतील पोलिस आहे, असे सांगून अपर जिल्हाधिकारी व्यवहारे म्हणाले, सर्वांनी आपापल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी. सोशल मिडीयावर येणा-या अफवांवर विश्वास ठेवू नये. मोहर्रम आणि एकादशी एकत्रित येत असून ग्रामीण स्तरावर जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधितांना योग्य निर्देश द्यावेत. मोकाट जनावरे, रस्त्यावरील खड्डे याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था, सा. बा. विभागाने विशेष देणे गरजेचे आहे. सण उत्सवाच्या कालावधीत वीज पुरवठा अखंडीत सुरू राहील, याची महाविरतण कंपनीने काळजी घ्यावी. या कालावधीत मद्यविक्रीचा साठा अचानक वाढणार नाही, यासाठी उत्पादन शुल्क विभागाने तपासणी करावी. प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलिस विभागाने वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करावे. तसेच आरोग्य विभागाने फिरते वैद्यकीय पथक, पुरेसा औषधीसाठी ठेवावा, अशा सुचना त्यांनी दिल्या.

## अफवांबाबत सर्वांनी अलर्ट राहावे : अतिरिक्त पोलिस अधिक्षक कातकाडे

सोशल मिडीयाबाबत सर्वांनी दक्ष राहणे गरजेचे असून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या माध्यमातून आजकाल बनावट पोस्ट करणे शक्य असून, असे आढळल्यास त्वरीत सायबर पोलिस स्टेशनसोबत संपर्क करावा. शांतता राखणे ही प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. सण आणि उत्सवादरम्यान पुरेसा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येईल. ध्वनी प्रदुषणाबाबत डीजे ऑपरेटर्सची बैठक घेऊन मर्यादेचे पालन करण्याचे त्यांना सांगितले जाईल. उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. चंद्रपूर जिल्ह्यातील आगामी सण उत्सव शांततेत पार पडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांनीसुध्दा मनोगत व्यक्त केले. तसेच शांतता समितीच्या उपस्थित सदस्यांनी सुचना केल्या. कार्यक्रमाचे संचालन मंगला घागी यांनी केले. बैठकीला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी, मुख्याधिकारी, पोलिस पाटील आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१. चंद्रपूर

दुरध्वनी क्रमांक : ०७१७२-२५०२४५
E-mail ID : chandrapur.eemahapwd.com

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सिव्हील, लाईन्स, चंद्रपूर-४४२४०१

जावक क्रमांक:९१९२/भांडार/२०२४ दिनांक :०२/०७/२०२४

**दरपत्रक सुचना क्र.१२**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.१, चंद्रपूर यांच्या वतीने सा.बां. मंडळ, चंद्रपुर अंतर्गत विभागीय तथा उपविभागीय कार्यालयात शासकीय कामकाजा करीता अर्धकूशल कामगारांची आवश्यकता आहे. तरी नोंदणीकृत ऐजन्सी/संस्था/कंत्राटदाराकडुन सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | अर्धकुशल पदे पुरविण्यात येणाऱ्या विभाग उपविभागाचे नाव | परिमाण | कामाचे दिवस | रोजंदारी दर | अंदाजपत्रकीय किंमत Excluding GST 18% | पुरवठा दारांनी सादर करावयाचे दर (% नुसार) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सा.बां. विभाग क्र.१, चंद्रपूर | १ | ७२६ (शिपाई) ३३० (चौकीदार) | ७८१/- | ८२४७३६/- | |
| २ | सा.बां. उपविभाग भद्रावती | १ | | | | |
| ३ | सा.बां. उपविभाग गडचांदुर | १ | | | | |
| ४ | सा.बां. उपविभाग जिवती | १ | | | | |
| | एकुण कामाचे दिवस | | १०५६ | | | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी / पुरवठाधाकांनी दिनांक ११/७/ २५ दुपारी ३.०० वाजेपर्यत मोहोरबंद लखोट्यात स्पर्धात्मक दर (दरपत्रके) सादर करावी. दरपत्रकामध्ये टक्केवारी नुसार दर सादर करावे.

सदर कामाकरीता कमी दर सादर करणाऱ्या नोंदणीकृत ऐजंन्सी/संस्था/ कंत्राटदारास कार्यारंभ आदेशात नमुद अटी व शर्तीनुसार अर्धकुशल कामगार पुरवठा करणे बंधनकार राहील.

सदर कामाचे दरपत्रके स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार किंवा पून्हा दरपत्रके मागविण्याचा अधिकार खाली सही करणाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

(ए. डी. पगारे)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१, चंद्रपूर

क्र. संभावज/नाग/२३०/२०२५

# प्रत्येक भारतीय ४.८ लाख रुपयांचा कर्जदार

भारतातील प्रत्येक व्यक्तीवर सरासरी ४.८ लाख रुपये कर्ज आहे. मार्च २०२३ मध्ये ते ३.९ लाख रुपये होते. गेल्या दोन वर्षांत त्यात २३% वाढ झाली आहे. म्हणजेच प्रत्येक भारतीयाचे सरासरी कर्ज ९०,००० रुपयांनी वाढले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने त्यांच्या जून २०२५ च्या आर्थिक स्थिरता अहवालात ही माहिती दिली आहे.

---------------------

**कर्ज वाढणे म्हणजे काय?**

याचा अर्थ असा की लोक पूर्वीपेक्षा जास्त कर्ज घेत आहेत. यामध्ये गृहकर्ज, वैयक्तिक कर्ज, क्रेडिट कार्ड थकबाकी आणि इतर किरकोळ कर्जे समाविष्ट आहेत.

वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्ड देयके यासारख्या बिगर-गृहनिर्माण किरकोळ कर्जांमध्ये सर्वाधिक वाढ झाली आहे. एकूण देशांतर्गत कर्जाच्या ५४.९% ही कर्जे आहेत.

हे खर्च करण्यायोग्य उत्पन्नाच्या २५.७% आहे. गृहकर्जांचा वाटा २९% आहे आणि यातील बहुतेक कर्जे अशा लोकांची आहेत, ज्यांनी आधीच कर्ज घेतले आहे आणि ते पुन्हा घेत आहेत.

आरबीआयच्या मते, भारतावर एकूण जीडीपीच्या ४२% कर्ज आहे. देशांतर्गत कर्ज अजूनही इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपेक्षा (ईएमई) कमी आहे, जिथे ते ४६.६% आहे. म्हणजेच, भारतातील कर्जाची परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. तसेच, बहुतेक कर्जदारांचे रेटिंग चांगले आहे, म्हणजेच त्यांच्याकडून पैसे गमावण्याचा धोका कमी आहे.

सध्या या कर्जापासून कोणताही मोठा धोका नसल्याचे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. बहुतेक कर्जदारांचे रेटिंग चांगले आहे. ते कर्ज परतफेड करण्यास सक्षम आहेत. तसेच, कर्ज फेडण्यास




असमर्थ होण्याचा दर म्हणजेच कर्ज फेडण्यास असमर्थ होण्याचा दर कोविड-१९ च्या तुलनेत कमी झाला आहे. तथापि, ज्यांचे रेटिंग कमी आहे आणि कर्ज जास्त आहे त्यांच्यासाठी काही धोका आहे.

**सूक्ष्मवित्त क्षेत्रातील कर्जाची परिस्थिती**

सूक्ष्मवित्त क्षेत्रातील (लहान कर्ज गट) कर्जदारांचे सरासरी दायित्व ११.७% ने कमी झाले आहे, परंतु २०२५ च्या दुसऱ्या सहामाहीत ताणतणावाच्या मालमत्तेची संख्या वाढली आहे. आरबीआयने म्हटले आहे की, सूक्ष्मवित्त कंपन्या जास्त व्याजदर आणि मार्जिन आकारत आहेत. ज्यामुळे कर्जदारांना परतफेड करणे कठीण होत आहे.

**भारताचे बाह्य कर्ज**

मार्च २०२५ पर्यंत, भारताचे परकीय/बाह्य कर्ज $७३६.३ अब्ज होते, जे गेल्या वर्षीपेक्षा १०% जास्त आहे. हे जीडीपीच्या १९.१% आहे. यामध्ये सर्वात मोठा वाटा ३५.५% बिगर-वित्त कंपन्यांचा, २७.५% ठेवी घेणाऱ्या संस्थांचा आणि २२.९% सरकारांचा आहे. अमेरिकन डॉलरमध्ये घेतलेले कर्ज एकूण परकीय कर्जाच्या ५४.२% आहे.

**सामान्य लोकांवर परिणाम**

सामान्य लोकांसाठी, याचा अर्थ असा की कर्ज घेणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे, परंतु कर्जाचा भारही वाढत आहे. जर तुम्ही कर्ज घेत असाल तर तुमची परतफेड करण्याची क्षमता लक्षात ठेवा.

आरबीआयच्या लवचिक चलन धोरणामुळे व्याजदर कमी होऊ शकतात. यामुळे कर्जाची परतफेड करणे सोपे होऊ शकते, परंतु सूक्ष्म वित्त कर्ज घेताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे कारण त्यांचे व्याजदर जास्त असू शकतात.




# : सेक्सटॉर्शन :
## ऑनलाइन फसवणुकीचा नवा मार्ग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेटचे स्वरूप जसे विस्तारित गेले तसे ऑनलाइन गुन्हेगारीही विस्तारित गेली. ऑनलाइन गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची सायबर शाखा सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे.

असे असतानाही ऑनलाइन गुन्हे करणारे नवनवीन मार्ग शोधून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत असतात. या फसवणुकीला केवळ सर्वसामान्य नागरिकच नाही तर नोकरदार, व्यावसायिक, डॉक्टर, वकील, इंजिनियर या सारखे प्रतिष्ठित नागरिक ही बळी पडतात. या सायबर गुन्हेगारांनी आता फसवणुकीचा मार्ग शोधून काढला आहे. तो आहे सेक्सटॉर्शन.

अलीकडच्या काळात ऑनलाइन लैंगिक छळाचे प्रमाण वाढले आहे त्यातूनच हा शब्द निर्माण झाला आहे. अक्स्टॉर्शन म्हणजे खंडणी तसाच लैंगिक खंडणी म्हणजे सेक्सटॉर्शन. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटचा यासाठी वापर केला जातो. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटवरुन तुम्हाला एका अनोळखी मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट येते. ती फ्रेंड रिक्वेस्ट माहिती न घेता स्वीकारली जाते.

नंतर मेसेंजरच्या माध्यमतातून चॅटिंग केली जाते. त्यानंतर एकमेकांचे व्हाट्सएप नंबर घेऊन व्हाट्सएपवर चॅटिंग होते. चॅटिंग बरोबरच व्हिडीओ कॉल, व्हाट्सएप कॉल करण्यास सुरुवात होते. समोरची व्यक्ती अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव करते. समोरच्या व्यक्तीला मोहात अडकवले जाते. त्याला प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून विवस्त्र अश्लील बाबी करून घेतल्या जातात.

विशेष म्हणजे या सर्वांचे व्हिडीओ ऑन स्क्रीन रेकॉर्ड केले जाते. त्यानंतर काही दिवसांच्या फरकाने तुम्हाला मेसेज, फोन कॉल करून पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास तुमचा अश्लील व्हिडीओ व्हायरल करून बदनाम करण्याची धमकी दिली जाते.

अशा प्रकारे लैंगिक खंडणी सेक्सटॉर्शनची मागणी केली जाते. यात प्रामुख्याने कॉलेजमधील विद्यार्थी व समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना टार्गेट केले जाते. यात फसणारे बदनामीला घाबरून या सायबर गुन्हेगारांना हवी ती रक्कम देतात. बऱ्याचदा रक्कम देऊनही पुन्हा मागणी केली जाते. त्यामुळे फसवले गेलेले मानसिक तणावात येतात त्यातून ते आत्महत्येचा मार्गही स्वीकारतात. या प्रकाराला बळी पडून काही जणांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

सेक्सटॉर्शन हा पैसे कमावण्याचा नवा मार्ग सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. या सायबर गुन्हेगारांना पकडणे सायबर पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले आहे कारण हे गुन्हेगार राज्याबाहेर किंवा देशाबाहेरचेही असू शकतात.

या सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना सावधगिरी बाळगायला हवी. कोणाचीही अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. आपली फ्रेंड लिस्ट आणि फॉलोअर्स वाढवण्याचा अट्टाहास आपले आर्थिक व मानसिक नुकसान करू शकतो.

आजची तरुणाई सोशल मीडियाची मोठी फॅन बनली आहे. इंटरनेट, मोबाईल ही तरुणांची जीवनावश्यक गरज बनली आहे. मात्र याचा वापर समाजहिताच्या गोष्टी जोपासण्यासाठी झाला तरच उत्तम नाहीतर तुमची एक चूक तुमच्या जिवावरही बेतू शकते. म्हणूनच प्रत्येकाने सावधगिरी बाळगून सोशल मीडियाचा वापर करावा.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# स्वामी विवेकानंद : तेजस्वी युगपुरुष



स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण, धम्मपद, तनाख, गुरू ग्रंथ साहिब, दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा अवगत केलेल्या होत्या.

जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.

स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला. देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दुःखावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.

११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली. भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला. त्यांनी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात बंधु व भगिनी असे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला.

स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य विवेकानंद यांनी केले.

त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्मांच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते.

त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला.

निराकार समाधीत मन रहाण्याची स्वतःची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.

आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे, त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते. १८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला.अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले. असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.

आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.परंतु अचानक ४ जुलै १९०२ ला ३९ व्या वर्षी स्वामींची प्राणज्योत मालवली व भारतासह जगातील अनेक राष्ट्रांना धक्का बसला.कारण स्वामी अल्प वयात आपल्याला सोडून गेले आणि ज्ञानाची तेजस्वी जोत मावळली.

अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे आज सर्वांनाच वाटते. आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या हृदयात घर करून आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल. जोपर्यंत सुर्य, चंद्र, तारे, आकाश-पाताळ, ग्रह-तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच हृदयात राहिल.

स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावर्गानी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन २मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला स्वामींचे दर्शन अवश्य होईल. स्वामीच्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम. जय हिंद!



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

# वारीतील वैकुंठदर्शन : पंढरपुरची आनंदयात्रा

**आषाढ मास म्हणजे आनंदाची पर्वणी. पावसाच्या पहिल्या सरींचा स्पर्श होताच निसर्ग हिरवा-गर्द होतो. शेतकरी राजा नवीन आशेने पेरण्या करत शाश्वत सुखाच्या वाटेवर निघतो, आणि त्या वाटेवर त्याचे अंतिम लक्ष्य असते...पंढरपूर! ही वाट म्हणजेच पंढरीची वारी....भक्ती, समर्पण आणि सामूहिक साधनेचा उत्कट आविष्कार!**

-----------



वारी म्हणजे केवळ धार्मिक अनुष्ठान नव्हे, ती आपल्या संस्कृतीचं अद्वितीय महावैभव आहे. वर्ण, जात, पंथ, लिंग या सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन वारीत सहभागी होणारा प्रत्येक वारकरी माऊलीच्या चरणी एकरूप होतो. इथे ना निमंत्रण लागतं ना औपचारिकता येथे असतो केवळ अंतःकरणातील प्रेम आणि श्रध्देचा ओसंडून वाहणारा झरा! तो मी मागच्या वर्षी अनुभवला.

**पंढरपूर : पृथ्वीवरील वैकुंठ**

संत नामदेव म्हणतात...

*आधी रचिली पंढरी,*
*नंतर वैकुंठ नगरी...*

संत चोखामेळा म्हणतात...

*न करी आळस, जाय पंढरीशी, अवघी सुखराशी, तेथे आहे...*

यावरून पंढरपूरच्या अध्यात्मिक आणि ऐतिहासिक स्थानाचा वेध घेतला जातो. काशी व पंढरपूर या दोन तीर्थक्षेत्रांनाच अविनाशी महत्त्व प्राप्त झाले आहे. इथे देव म्हणजे भावभक्तीचा प्रत्यक्ष अनुभव.

पंढरपूरचा विठोबा कोणत्याही मूल्याच्या नव्हे, तर भावनेच्या आधारे प्रसन्न होतो. म्हणूनच म्हणतात...देव भावाचा भुकेला. तिथे आळंदी-देहू येथून चालत येणाऱ्या संतांच्या पालख्या, भगव्या पताका, टाळ-मृदंगाचा गजर आणि ओठांवरील विठ्ठल! विठ्ठल! ही गूंज... हेच पंढरपूरच्या वारीचे विशेष!

**वारी : भक्तीचा महासोहळा**

वारीची संकल्पना संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांनी रुजवली. वर्षानुवर्षे सातत्याने सुरू असलेली वारी म्हणजे एक समष्टी साधना, व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी संपूर्ण समाज मिळून केलेला प्रयत्न! हजारो दिंड्या, हजारो वारकरी, पण सर्वांच्या मनात एकच ध्यास विठ्ठलनाम!

पालखीतील शिस्त, टाळ-चिपळ्यांची तालबद्ध चाल, विणेकऱ्यांची भजनं, आणि टाळकरींचा पदन्यास, ही शिस्त म्हणजे वारीचा गाभा. आपल्या घरातील जबाबदाऱ्या काही दिवस बाजूला ठेवून, हजारो किलोमीटर प्रवास करून, ऊन-पावसाची पर्वा न करता विठुरायाच्या चरणी येणं झ ही भक्तीच्या प्रेमाची परिसीमा आहे.

**वारीतील अनुभूती जीवनाचा अर्थ**

वारी करणं म्हणजे केवळ पंढरपूरपर्यंत चालत जाणं नव्हे, तर जीवनाचे सार आत्मसात करणं आहे.

वारी मार्गावर येणाऱ्या अडचणी, संकटं, ताण-तणाव या सगळ्यांवर श्रद्धेचा विजय कसा मिळतो, हे वारकरी शिकवतात. पंढरपूरात विठ्ठलाचे दर्शन घडते तेव्हा त्या एका क्षणात संपूर्ण वारीचे श्रम, तपस्या आणि भक्ती सार्थक झाल्याची अनुभूती होते. आणि वाटतं... हा सोहळा कधीच संपू नये!

वारीनंतर वारकरी घरी परततो, पण त्याच्या मनात विठ्ठलाचे नाम साकळलेलं असतं.

*जातो माघारी पंढरीनाथा।*
*तुझे दर्शन झाले आता*

तो स्वतःपुरता नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी विठ्ठलमय होतो. म्हणूनच पंढरपूरची वारी ही भावभक्तीची संस्कारयात्रा ठरते.

**एकदा तरी अनुभवावी ही वारी**

वारी म्हणजे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा श्वास आहे. विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल म्हणत जेव्हा हजारो भाविक पंढरपूरच्या वाटेवर निघतात, तेव्हा त्या प्रत्येकाच्या पावलांमध्ये असते श्रद्धा, विश्वास आणि भगवंताच्या सान्निध्याची ओढ. जीवनात एकदा तरी ही वारी अनुभवावी. कारण ती फक्त पंढरपूरची यात्रा नाही, तर स्वतःच्या आत्म्याच्या गाभ्याशी होणारी एक थेट भेट असते.



अरूण सोपानराव कराळे
सेवानिवृत्त पदाविधर शिक्षक
एम.ए. (मराठी ), एम.ए. (समाजशास्त्र ), डी.एड. बी.एड., डी.एस.एम
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

# पावसात वाढतो अपघातांचा धोका




पावसाळ्यात कडक उन्हापासून आराम मिळतो. पण त्यामुळे रस्त्यावर प्रवास करणे खूप आव्हानात्मक बनते. पावसाळ्यात रस्त्यावर पाणी आणि चिखल साचतो, जो कधीकधी वाहनचालकांसाठी धोकादायक ठरतो.

अशा परिस्थितीत, पावसाळ्याच्या वाहन चालवताना अधिक सतर्क आणि सावध राहणे खूप महत्वाचे आहे. पावसानंतर रस्त्यांवरील धूळ आणि चिखल निसरड्या थरात बदलतो. अशा परिस्थितीत वाहन घसरण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. तसेच, ओल्या रस्त्यांवर ब्रेक लावण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त अंतर आवश्यक असते. या काळात अचानक ब्रेक लावणे धोकादायक ठरते. मुसळधार पावसात दृश्यमानता खूप कमी होते. रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे खड्डे दिसत नाहीत. यामुळे वाहनाचा तोल जाऊ शकतो किंवा तो पाण्यात अडकू शकतो. पावसाळ्यात गाडी चालवण्यापूर्वी, वाहनाचे काही भाग जसे टायर, ब्रेक सिस्टम, वाइपर, हेडलाइट्स, टेललाइट्स आणि इंडिकेटर तपासा. जास्त वेगाने गाडी चालवणे, अचानक ब्रेक लावणे किंवा वळणे, पाणी साचलेले रस्ते ओलांडणे अशा चुका करू नका. पावसात ओव्हरटेक करणे खूप धोकादायक असू शकते. ओले रस्ते आणि कमी दृश्यमानता यामुळे योग्य निर्णय घेणे कठीण होऊ शकते. म्हणून ओव्हरटेक करण्याची घाई करू नका आणि इतर वाहनांपासून पुरेसे अंतर राखा. मोबाईल फोनचा वापर वाहन चालवताना करू नका.

# जिऱ्याचे की ओव्याचे पाणी रिकाम्यापोटी पिणे फायदेशीर



आजकाल बरेच लोकं त्यांच्या आरोग्याबद्दल पूर्वीपेक्षा जास्त सतर्क झाले आहेत. कारण बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकाना आरोग्याच्या वेगवेगळ्या समस्यांना समोरे जात आहे.

यासाठी बहुतेक लोकं चांगल्या आरोग्यासाठी खाण्याच्या सवयी सुधारणे, सकाळी लवकर उठणे , योगा करणे आणि घरगुती उपायांचा अवलंब करणे हे आता निरोगी जीवनशैलीचा एक भाग बनले आहे. विशेषतः पोटाशी संबंधित समस्या, जसे की गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि पोट फुगणे सामान्य झाले आहेत. त्यामुळे लोकं औषधांऐवजी घरगुती उपचारांना महत्त्व देऊ लागले आहेत.

या घरगुती उपायांमध्ये सर्वात जास्त चर्चेत असलेली दोन नावे म्हणजे जिऱ्याचे पाणी आणि ओव्याचे पाणी. तसेच जिरा व ओवा हे दोन्हीही वर्षानुवर्षे पारंपारिक भारतीय स्वयंपाकघरात वापरले जात आहेत आणि आयुर्वेदातही ते पोटासाठी फायदेशीर मानले जातात.

बरेच लोकं सकाळी रिकाम्या पोटी जिऱ्याचे व ओव्याचे पाणी पितात, परंतु प्रश्न असा आहे की या दोघांपैकी कोणते पाणी पोटांसाठी व आरोग्यासाठी जास्त फायदेशीर आहे?

आपल्या निरोगी आरोग्यासाठी आपण रोज सकाळी जर रिकाम्या पोटी जिऱ्याचे व ओव्याचे पाणी पिणे फायदेशीर आहे का? तर या प्रश्नाचे उत्तर आयुर्वेद तज्ज्ञ किरण गुप्ता यांनी सांगितले की जिरे आणि ओव्याचे पाणी दोन्ही फायदेशीर आहेत. परंतु त्यांचा परिणाम ऋतू आणि आरोग्याच्या गरजेनुसार केला पाहिजे.

जसे की उन्हाळ्यात ओव्याचे पाणी खूप गरजेच्या वेळीच प्यावे. उन्हाळ्यात जिरे पाणी अधिक फायदेशीर असते कारण यात थंडावा असतो आणि पोट शांत करण्यास आणि बद्धकोष्ठता, गॅस आणि आम्लता यासारख्या अनेक समस्यांपासून मुक्त होण्यास मदत होते.

**उन्हाळ्यात जिरे पाणी पिण्याचे फायदे?**

तज्ज्ञ किरण गुप्ता जी यांनी सांगितले की उन्हाळ्यात जिरे पाणी प्यायल्याने पोट थंड राहते, ज्यामुळे अनेक प्रकारच्या समस्यांपासून आराम मिळतो. जिरे पाणी प्यायल्याने पोट साफ होते.


गॅस, बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त या समस्या देखील कमी होतात. तसेच, रिकाम्या पोटी जिरे पाणी प्यायल्याने चयापचय गतिमान होते, ज्यामुळे फॅट बर्न होण्याची प्रक्रिया देखील वेगवान होते.

**उन्हाळ्यात ओव्याचे पाणी आरोग्यासाठी फायदेशीर आहे?**

ओव्याचे पाणी देखील आरोग्यासाठी फायदेशीर आहे. मासिक पाळीच्या दरम्यान पोटदुखीवर ओव्याचे पाणी फायदेशीर मानले जाते. परंतु उन्हाळ्यात जेव्हा खूप गरज असते तेव्हाच ते सेवन करावे. तज्ञांच्या मते, उन्हाळ्यात ओव्याचे पाणी प्यायल्याने ॲसिडिटीची समस्या वाढू शकते. त्याच वेळी जर उन्हाळा नसेल तर ओव्याचे पाणी देखील खूप फायदेशीर आहे.

जसे की त्यात अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आहेत जे आतडे स्वच्छ करतात आणि पोटातील हानिकारक बॅक्टेरिया मारण्यास मदत करतात. ओव्याचे पाणी फॅट बर्न करण्यासाठी मदत करते, म्हणून हे पाणी वजन कमी करण्यास देखील उपयुक्त आहे.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## धोक्याची घंटा..!

आजकाल शाळा कॉलेज
का बरे पडू लागलेत ओस
कोचिंग क्लासेसना मात्र
पाठींबा मिळतोय भरघोस

क्लासेस पेक्षा ट्रेन शिक्षक
आहेत शाळा कॉलेज वरती
वेतनही मिळतेय ना
भाऊ पाच अंका वरती

संबधित घटकांनी याचं
करायलाच हवं चिंतन
सुज्ञ आहेत सारे
जाणून घ्या जनतेचं मन..

शिक्षणाचा दर्जा खालावला
सारेच करती कोल्हेकुई
पण दर्जेदार शिक्षणासाठी
संबधित का विडा उचलत नाही?

## अदानी ग्रीन एनर्जीचा १५,५०० मेगावॅट कार्यरत क्षमतेसह भारतातील आघाडीची नवीकरणीय ऊर्जा कंपनी

**गोंदिया, ३ जुलै :** अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड ने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी करत १५,५३९.९ मेगावॅट कार्यरत क्षमतेचा टप्पा पार केला आहे. भारतातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आणि वेगात वाढलेली नवीकरणीय ऊर्जा क्षमता असून, कंपनीने १५ महिन्यांत ५,००० मेगावॅट नव्याने जोडली आहे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड ही भारतातील एकमेव कंपनी आहे जी पूर्णतः ग्रीनफिल्ड प्रकल्पांच्या माध्यमातून या टप्प्यावर पोहोचली आहे. कंपनीचे सध्याचे कार्यरत पोर्टफोलिओ सुमारे ११,००५.५ मेगावॅट सौर, १,९७७.८ मेगावॅट वारा, आणि २,५५६.६ मेगावॅट सौर-वाऱ्याचे मिश्रित प्रकल्प असे आहे.

श्री. आशिष खन्ना - मुख्य कार्यकारी अधिकारी, अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड यांनी यशाबद्दल अभिमान व्यक्त करताना म्हणाले: १५,००० मेगावॅट चा टप्पा पार करणे हे आमच्या कार्यसंघाच्या समर्पणाचे आणि आमच्या प्रवर्तकांच्या दूरदृष्टीचे फळ आहे. श्री गौतम अदानी यांच्या जगातील अग्रगण्य नवीकरणीय ऊर्जा उत्पादक होण्याच्या स्वप्नातून प्रेरित होत आम्ही २०३० पर्यंत ५०,००० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. ७.९ दशलक्ष घरांना ऊर्जा, ईशान्य भारत संपूर्ण उजळणार अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड चे प्रकल्प सुमारे ७.९ दशलक्ष घरांना ऊर्जा पुरवठा करू शकतात. या क्षमतेच्या माध्यमातून कंपनी भारतातील १३ राज्यांत स्वच्छ ऊर्जा पोहोचवू शकते, तसेच संपूर्ण ईशान्य भारत वीजेत उजळवू शकतो.

खावडा प्रकल्प पृथ्वीवरचा सर्वात मोठा ऊर्जा प्रकल्प गुजरातमधील खावडा येथे अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड ३०,००० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प विकसित करत आहे. ५३८ चौ. किमी क्षेत्रफळ असलेला हा प्रकल्प पॅरिसपेक्षा पाचपट मोठा असून, अंतराळातूनही दिसू शकेल. आत्तापर्यंत ५,३५५.९ मेगावॅट ची क्षमता कार्यान्वित झाली आहे.

## ॲक्सिस म्युच्युअल फंडातर्फे नवीन थीमॅटिक संधी देणारा ॲक्सिस सर्व्हिसेस अपॉर्च्युनिटीज फंड सादर

**मुंबई, ३ जुलै :** भारतातील अग्रगण्य मालमत्ता व्यवस्थापन (ॲसेट मॅनेजमेंट) कंपन्यांपैकी एक असलेल्या ॲक्सिस म्युच्युअल फंडने आज सेवाक्षेत्र संकल्पनेनुसार गुंतवणूक करणाऱ्या आणि एक ओपन-एंडेड इक्विटी स्कीम असलेला ॲक्सिस सर्व्हिसेस अपॉर्च्युनिटीज फंड सादर करण्याची घोषणा केली. न्यू फंड ऑफर ४ जुलै २०२५ रोजी सदस्यत्वासाठी खुले होईल आणि १८ जुलै २०२५ रोजी बंद होईल. ॲक्सिस सर्व्हिसेस अपॉर्च्युनिटीज फंड भारताच्या सेवाक्षेत्रावर आधारित आर्थिक परिवर्तनाच्या अग्रभागी असलेल्या अशा कंपन्यांच्या विशेष निवडक पोर्टफोलिओमध्ये गुंतवणूक करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. ज्या व्यवसायांच्या मुख्य उत्पन्नाचा स्रोत सेवाधारित योजनांमधून आहे अशा विस्तारीत, भांडवलाच्या दृष्टीने कार्यक्षम आणि स्पर्धात्मकदृष्ट्या लाभदायक व्यवसायात गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवली वृद्धी साधणे हा या फंडाचा उद्देश आहे. या फंडाचे व्यवस्थापन श्रेयस देवलकर (हेड इक्विटी), सचिन रेलेकर (सीनियर फंड मॅनेजर) आणि मिस कृष्णा नारायण (ओव्हरसिज गुंतवणुकीसाठी) हे करतील. भारताचा भविष्यातील विकास हा मोठ्या प्रमाणात सेवाक्षेत्रावर आधारित असेल अशी अपेक्षा आहे आणि या क्षेत्रासाठी असलेले स्ट्रक्चरल टेलविंड्स खोलवर आणि टिकाऊ आहेत, असे ॲक्सिस एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बी. गोपकुमार यांनी सांगितले. ॲक्सिस सर्व्हिसेस अपॉर्च्युनिटीज फंडद्वारे आम्ही गुंतवणूकदारांना एक सक्रियपणे व्यवस्थापित करणारी संधी देत आहोत जी या दीर्घकालीन परिवर्तनाचा लाभ घेण्यासाठी तयार केली आहे. पारंपरिक बँकिंग क्षेत्रापासून ते ई-कॉमर्स, फिनटेक आणि हेल्थकेअरमधील उदयोन्मुख मॉडेल्सपर्यंत, हा फंड भारताच्या सेवाक्षेत्रातील सर्वोत्तम गोष्टी निवडण्याचा प्रयत्न करतो. सगळ्या चक्रांमध्ये टिकून राहणाऱ्या आणि उच्च दर्जाचा जोखीम समायोजित परतावा देणाऱ्या दर्जेदार, भांडवलीदृष्ट्या कार्यक्षम व्यवसायांची ओळख करून देणे या आमच्या दीर्घकालीन गुंतवणूक तत्त्वज्ञानाशी हे सुसंगत आहे.

## नथिंग भारतात सादर करत आहेत त्यांचा पहिलावहिला फ्लॅगशीप



**मुंबई, ३ जुलै :** नथिंग या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीने आज भारतात त्यांची अशी दोन उत्पादने सादर केली ज्यामुळे संबंधित विभागातील मापदंड नव्याने रचले जातील. नथिंग फोन (३) हा त्यांचा खऱ्या अर्थाने पहिला फ्लॅगशीप स्मार्टफोन आणि नथिंग हेडफोन (१) हे पहिले ओव्हर इअर ऑडिओ उत्पादन सादर करण्यात आले. विचारपूर्वक डिझाइन आणि वैशिष्ट्यपूर्ण नाविन्यतेसह ग्राहकोपयोगी तंत्रज्ञानाला नवे स्वरूप देण्याचा नथिंगचा दृष्टिकोन या दोन्ही उत्पादनांतून प्रतित होत आहे. नथिंग फोन (३) मुळे स्मार्टफोनचा परफॉर्मन्स आणि अभिव्यक्तीचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. तंत्रज्ञान पुन्हा एकदा आपलेसे वाटावे यासाठी खास तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये कमी प्रकाशातही सुंदर फोटो काढता यावेत यासाठी या क्षेत्रातील सर्वोत्तम अशा १/१.३ मेन सेन्सरसह प्रो ग्रेड ट्रिपल कॅमेरा प्रणाली, लॉसलेस ऑप्टिकल झूम आणि पूर्ण ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशनसह सर्व लेन्सेसमध्ये सिनेमॅटिक ४के ६० एफपीएस व्हिडीओची सोय आहे. अल्ट्रा नॅरो बेझल्ससह अत्यंत सुंदर ६.६७ अमोलेड डिस्प्ले, दमदार स्नॅपड्रॅगनएँ ८एस जनरल ४ चिपसेट ही सगळी वैशिष्ट्ये प्रीमिअम दर्जाच्या मॉड्युलर डिझाइनमध्ये देण्यात आली आहेत. यातील ग्लिफ मॅट्रिक्स मुळे वापरकर्त्यांना महत्त्वाची माहिती चटकन मिळते शिवाय रेकॉर्ड करण्यासाठी फ्लिप करा आणि ग्लिफ खेळणी सारख्या वैशिष्ट्यांमुळे गुंतवून ठेवणारा खेळकर अनुभव मिळतो. फोन (३) मध्ये नवा ट्राय-कॉलम लेआऊट देण्यात आला आहे. या नव्याने डिझाइन करण्यात आलेल्या आर अँगल आकारामुळे अर्गोनॉमिक्सही अधिक चांगले झाले आहेत. फोनच्या पुढच्या बाजूला एकसारख्या १.८७ मिमी. कडा आहेत. त्यामुळे फोन (२) च्या तुलनेत हा फोन १८ टक्के स्लिम किंवा पातळ आहे. तसेच यात अधिक शार्प, सुस्पष्ट आणि गुंतवून ठेवणारा अमोलेड स्क्रीनचा अनुभव मिळतो.

नथिंग हेडफोन (१) सह नथिंग ने ओव्हर इअर ऑडिओ विभागात पदार्पण केले आहे. केईएफ सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या हेडफोनमध्ये उत्कृष्ट डिझाइन आणि सुयोग्य तंत्रज्ञानाचा सुंदर मेळ पहायला मिळतो. यातील खास ४० मिमी. दमदार ड्रायव्हर, हेड ट्रॅकिंगसह रिअल टाईम स्पेटिअल ऑडिओ अशा वैशिष्ट्यांमुळे या आवाजात तुम्ही अगदी गुंतून जाल. दिवसभर तुम्हाला या हेडफोनचा वापर आरामदायी वाटावा यासाठी यात ॲल्युमिनिअम आणि पीयू मेमरी फोम अशा प्रीमिअम घटकांचा वापर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे यातील खास कंट्रोल्स म्हणजेच रोलर, पेडल आणि बटनांचा वापरही सहजसोपा असल्याने तुम्ही आवाज, मीडिया आणि एएनसी वर योग्य नियंत्रण ठेवू शकता.

दैनंदिन वापर आणि ऑडिलोफाइल परफॉर्मन्ससाठी खास बनवण्यात आलेल्या नथिंग हेडफोन (१) मध्ये हाय-रेज ऑडिओ, एलडीएसी, यूएसबी-सी लॉसलेस प्लेबॅक आणि ३.५ मिमी. वायर्ड मोड आहेत. यात एएनसीसह ३५ तासांपर्यंतचा प्लेबॅक टाइम मिळतो तसेच फक्त ५ मिनिटांच्या चार्जिंगमध्ये २.४ तासांपर्यंत वापर शक्य होतो. यातील ड्युएल डिव्हाइस कनेक्टिव्हिटी, एआय समर्थित कॉलची सुस्पष्टता तसेच चॅनल हॉप आणि ॲडव्हान्स ईक्यू सारखी इन ॲप कस्टमायझेशन टूल्स यामुळे सोयीस्कर आणि वैयक्तिक वापराला प्राधान्य मिळते.

## विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी ऑक्सफर्ड बिग रीड ग्लोबल चॅलेंजचे ७वे पर्व लाँच

**मुंबई, ३ जुलै :** २०२४ इंडेक्स* नुसार भारतीय व्यक्ती दर आठवड्याला प्रतिव्यक्ती १० तास ४२ मिनिटे वाचन करतात. भारताने वाचन वेळेमध्ये सर्वाधिक स्कोअर संपादित केला असला तरी विशेषत: शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचन आकलन आणि टीकात्मक सहभाग यात मोठी तफावत आहे.

''एनसीएफ २०२३ वाचनाला मुलभूत कौशल्य मानते, जे इतर सर्व शिक्षणासाठी पाया रचते. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये आम्ही वाचनाला महत्त्वपूर्ण क्षमता मानतो, जी जिज्ञासूवृत्ती, सहानुभूती आणि स्वावलंबी विचारसरणीला चालना देते,'' असे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सुकांत दास म्हणाले.

''ऑक्सफर्ड बिग रीड चॅलेंज विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रशंसित करते आणि अधिक माहितीपूर्ण, विचारशील पिढी घडवते. भारतातील ही सर्वात मोठी वाचन स्पर्धा विद्यार्थ्यांना पुस्तकांना एक्स्प्लोअर करण्यास, संकल्पना व्यक्त करण्यास आणि त्यांच्या कल्पकतेसाठी जागतिक स्तरावर ओळखले जाण्यास व्यासपीठ देते. या स्पर्धेच्या सातव्या पर्वासह आम्हाला भारतात स्पर्धेचे आयोजन करण्याचा अभिमान वाटतो, ज्यामुळे व्यापक संधी उपलब्ध होतात आणि भावी वाचक व विचारवंत घडतात,'' असे सुकांत पुढे म्हणाले.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाप्रती आवड निर्माण करण्याच्या आणि साक्षरता वाढवण्याच्या सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस (ओयूपी)ने त्यांच्या वार्षिक ऑक्सफर्ड बिग रीड ग्लोबल चॅलेंजच्या लाँचची घोषणा केली आहे. सातव्या पर्वामध्ये ही वाचन स्पर्धा देशभरातील शाळांना त्यांच्या प्राथमिक व माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना त्यांची वाचन कौशल्ये वाढवण्यासाठी जागतिक स्पर्धेत सहभाग घेण्यास प्रेरित करण्याचे आवाहन करते.

ऑक्सफर्ड बिग रीड ग्लोबल चॅलेंज २०२५ चा वाचन प्रभुत्वाला, तसेच सर्जनशील अभिव्यक्ती, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि शब्दांचे सखोल आकलन व अर्थ लावण्याला प्रेरित करत अध्ययनामधील तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे.

## गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने कलाकार आपल्या गुरुबद्दल आणि मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आहेत

**मुंबई, ३ जुलै :** प्रकाशाच्या वेगाने धावत असलेल्या या जगात आपली आगळीवेगळी जडणघडण करण्यात बऱ्याचदा एका शिक्षकाचे, गुरुचे किंवा मार्गदर्शकाचे मौन अस्तित्व जबाबदार असते. गुरु पौर्णिमेचे पावन औचित्य साधून सोनी सबवरील कलाकार सुमित राघवन, आशी सिंह, कृष्ण भारद्वाज आणि आरव चौधरी आपल्या जीवनावर असलेल्या आपल्या गुरूच्या सखोल प्रभावाविषयी सांगत आहेत. या अशा व्यक्ती आहेत ज्यांनी या कलाकारांना घडवले, त्यांना प्रेरणा दिली आणि प्रत्येक अपयशानंतर नव्या जोमाने उभे राहण्याची उमेद दिली. ही व्यक्ती कोणी शाळेतील शिक्षक असू शकते, माता-पिता, सह-कलाकार कोणीही असू शकते. आपल्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात आजही मार्गदर्शक होत असलेल्या गुरूंच्या कृपेसमोर हे कलाकार नतमस्तक आहेत.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, माझ्यासाठी गुरु म्हटले की माझे वडील माझ्या डोळ्यासमोर उभे राहतात. ते माझे पहिले शिक्षक होते, माझे कठोर टीकाकार आणि स्थायी आधार! त्यांनी मला केवळ मूल्ये शिकवली नाहीत, तर ती स्वतः जगून दाखवली. ते ज्या स्वाभिमानाने, प्रामाणिकपणे आणि नैतिक मूल्यांच्या आधारे जीवन जगले, ते पाहून माझ्या जीवनावर त्याला सखोल प्रभाव पडला. ते मानायचे की तुम्ही कितीही पुढे गेलात तरी तुमचे पाय किती जमिनीवर आहेत आणि तुम्ही इतरांना कसे वागवता हेच महत्त्वाचे असते.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, माझ्यासाठी, माझी गुरु ही माझी आई आहे. ती माझी सगळ्यात मोठी चीयरलीडर आणि सगळ्यात कडक समीक्षक देखील आहे. तिच्यामुळेच माझ्यात निर्भीडपणे स्वप्न बघण्याचे आणि ताठ मानेने चालण्याचे धाडस आले आहे. अभिनेत्री म्हणून मला ज्येष्ठ अभिनेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली, ज्यांनी त्यांच्या अभिनयातून आणि वागण्यातून खूप शिकवले. यश विनम्रतेनेच शोभते हे त्यांनी दाखवून दिले. यापैकीच एक व्यक्ती म्हणजे शब्बीर सर. उफ्फ ये लव है मुश्किल ... च्या सेटवर त्यांची शिस्त आणि निष्ठा बघून खूप प्रेरणा मिळते.

वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करणारा आरव चौधरी म्हणतो, माझ्यासाठी, माझे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे गुरु हे माझे माता-पिता आहेत. त्यांनी मला शिस्त, प्रामाणिकपणा, आणि साधेपणाचे मूल्य शिकवले, पुस्तकातून मिळणार नाहीत असे धडे माझ्याकडून गिरवून घेतले. लहान असल्यापासून मी आध्यात्मिक गुरु म्हणून बजरंगबलीचे पूजन केले आहे. माझे शाळेतले काही शिक्षक देखील मला आठवतात, खास करून सातवीत असतानाचे शिक्षक, ज्यांचा माझ्या प्रारंभिक जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. मी जेव्हा जयपूरमध्ये नाटकात काम करण्यास सुरुवात केली, तेव्हा माझ्या रंगमंचाच्या गुरुंनी माझ्यातील अभिनेता घडवला. मुंबईत आल्यानंतर, या क्षेत्रातील काही गुणी लोकांकडून तसेच सिनेमेटोग्राफर्स, निर्माते, दिग्दर्शक यांच्याकडून मला शिकण्याची संधी मिळाली.

तेनाली रामा मालिकेत तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, मला मनापासून असे वाटते की, तुम्हाला आयुष्यात भेटणारा प्रत्येक माणूस तुम्हाला काही ना काही तरी शिकवून जातो. त्यांची सोबत तुम्हाला अल्प काळ लाभो किंवा दीर्घ काळ. त्या प्रत्येकाकडून तुम्हाला एक धडा मिळतो. एक अभिनेता म्हणून, मला वेगवेगळ्या लोकांसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे- दिग्दर्शक, सह-अभिनेते, स्पॉट दादा, मेकअप आर्टिस्ट्स- आणि खरं सांगतो, मी त्या प्रत्येकाकडून काही तरी शिकलो आहे.

## रूपम शर्मा नाट्यमय पद्धतीने कुमकुम भाग्यमध्ये सोनालिका या भूमिकेत प्रवेश करत आहे!



**मुंबई, ३ जुलै :** झी टीव्हीवरील लोकप्रिय शो कुमकुम भाग्य भावनिक खोलपणा आणि अनपेक्षित वळणांमुळे प्रेक्षकांच्या मनात आपले स्थान टिकवून आहे. शिवांश (नमिक पॉल) आणि प्रार्थना (प्रणाली राठोड) आता मनापासून खऱ्या नात्याची सुरुवात करत आहेत, पण भूतकाळातील एक स्फोटक रहस्य त्यांच्या आयुष्यात वादळ घेऊन येण्याची शक्यता आहे. सूडाने सुरू झालेले लग्न आता हळूहळू प्रेमळ काळजीत बदलत आहे पण सोनालिका खूप आशेने परत येते, पण तिला अजिबात कल्पना नाही की तिला किती मोठ्या वादळाला सामोरे जावे लागणार आहे.

रूपम शर्मा म्हणाली, मी कुमकुम भाग्य नियमित पाहायचे आणि आता या प्रतिष्ठित शोचा भाग होणे ही एक वेगळीच भावना आहे. यात काम करण्याचा अनुभव खूपच सकारात्मक आहे. विशेषतः सोनालिका सारखी भूमिका करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी एक मोठी गोष्ट आहे. ती एक सामान्य मुलगी नाही, तिच्यात एक भावनिक झंझावात आहे. तिच्यात कमजोरी आहे, हेवेदावे आहेत, आणि जेव्हा तिला कळतं की ज्या व्यक्तीसोबत तिचं लग्न ठरलं होतं, तो आता तिचा राहिलेला नाही तेव्हा तिच्या जगात भूकंप होतो. तिची वेदना खूप खोल आहे आणि त्यामुळे ती खलनायकी रुपात प्रवेश करते. हे सर्जनात्मकदृष्ट्या मुक्त करणारे आहे. सोनालिका अशी मुलगी नाही जी सहज माघार घेईल, त्यामुळे ती नक्कीच शिवांश आणि प्रार्थनाला हादरवून सोडेल. ही भूमिका करताना मला खूप आवडत आहे आणि जेव्हा ती प्रेक्षकांसमोर येईल तेव्हा त्यांच्या प्रतिक्रिया पाहण्यासाठी मी खूपच उत्सुक आहे.

सोनालिकाचा नाट्यमय प्रवेश शिवांश आणि प्रार्थनाच्या नाजूक नात्यामध्ये वादळ निर्माण करेल, असे दिसत आहे. अशावेळी कुमकुम भाग्य पुन्हा एकदा एक भावनिकदृष्ट्या उत्कंठावर्धक भाग घेऊन येण्यासाठी सज्ज आहे. काय शिवांश भूतकाळाचा सामना करण्याचे धैर्य दाखवेल? प्रार्थना या सत्याचा सामना कसा करेल, जे नुकत्याच तयार होत असलेल्या त्यांच्या नात्याला हादरवून टाकू शकतं? सोनालिका स्वीकारू शकेल का की ज्या पुरुषासाठी ती परत आली आहे, तो आता तिचा राहिलेला नाही?

## सुम्बुल तौकीर खान सोनी सबवरील आगामी मालिका इत्ती सी खुशीमध्ये प्रमुख भूमिकेत दिसणार

**मुंबई, ३ जुलै :** सर्व वयोगटातील प्रेक्षकांना भावतील अशी हृदयस्पर्शी आणि संबद्ध कथानके सादर करणारी वाहिनी म्हणून सोनी सबची ख्याती आहे. या वाहिनीवर लवकरच एक नवीन कौटुंबिक नाट्य इत्ती सी खुशी सादर होणार आहे आणि या मालिकेत प्रमुख भूमिका करणार आहे एक अत्यंत गुणी अभिनेत्री, सुमबुल तौकीर खान. पडद्यावरची प्रभावी उपस्थिती आणि अभिनयातील गहिरेपण हे सुम्बुलच्या अभिनयाचे ठळक विशेष आहेत. ती या मालिकेत अन्विता दिवेकर ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

मुंबईच्या पार्श्वभूमीवरील इत्ती सी खुशी ही मालिका अन्विता या २१ वर्षीय मुलीची गोष्ट आहे. सहा भावंडांमध्ये सर्वात मोठ्या असलेल्या अन्वितावर अचानक आपल्या कोसळणाऱ्या कुटुंबाला सावरण्याची जबाबदारी येऊन पडते. तिचे वडील दारूच्या व्यसनाशी झगडत आहेत आणि आई त्यांना सोडून गेली आहे. अशा वेळी अन्विताच आपल्या कुटुंबाला एकत्र बांधून ठेवते आहे. आपल्या भावंडांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तिने स्वतःचे शिक्षण आणि आशा-आकांक्षा बाजूला सारल्या आहेत. तिचा दैनंदिन अस्तित्वाचा संघर्ष, मूक बलिदान आणि तिच्यातील प्रेम आणि चिकाटी या मालिकेत बघायला मिळेल. अन्विता या व्यक्तिरेखेविषयी सुम्बुल तौकीर खान म्हणते, इत्ती सी खुशी मालिकेत काम मिळाल्याचा मला खूप आनंद आहे. या हृदयस्पर्शी आणि ऊबदार मालिकेत अन्विताची कहाणी सादर करण्यास मी उत्सुक आहे. अन्विता दिवेकर टेलिव्हिजनवरील साचेबंद व्यक्तिरेखा नाही. ती सर्वार्थाने मुंबईची मुलगी आहे.

## पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पावर लागलेल्या पेपर फोडण्याच्या आरोपामुळे तिचे प्रेझेंटेशन बारगळणार?

मुंबई, २ जुलै : सोनी सब वाहिनीवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने त्यातील संबद्ध आणि हृदयस्पर्शी कथानकामुळे प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. कथानक आता एका नवीन प्रेरणादायक अध्यायाकडे वळले आहे. पुष्पा (करुणा पांडे)च्या जीवनात मोठ्या परिवर्तनाचा काळ आहे. कायद्याचे शिक्षण घेण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिची धडपड चालू आहे. दृढ निर्धार आणि जिद्दीने पुष्पा प्रवेश परीक्षा पास करून एका प्रतिष्ठित लॉ कॉलेजमध्ये मिळवते. प्रोफेसर राजवीर शास्त्री (गौरव चोप्रा) या कॉलेजातील प्रमुख प्राध्यापक आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, चाळीत धामधूम सुरू आहे आणि आरवचा वाढदिवस साजरा करण्यासाठी सगळे चाळकरी एकत्र आले आहेत. पुष्पा कॉलेजातल्या आपल्या महत्त्वाच्या दिवसासाठी तयार होते आणि त्याआधी या आनंद सोहळ्यात सामील होते. हा सोहळा सुरू असतानाच दिलीप (जयेश मोरे) एका माणसाला आपल्यासोबत घेऊन येतो. हा तोच माणूस आहे, ज्याचा प्रवेश परीक्षेचा पेपर चोरण्यात हात आहे. पेपर फुटण्याच्या प्रकरणात कादंबरी (वृंदा त्रिवेदी)चा हात असल्याचे सत्य त्याला उघडकीस आणायचे आहे.

आगामी भागांमध्ये, प्रेक्षकांना तीव्र नाट्य बघायला मिळणार आहे. दिलीप त्या इसमाला घेऊन येतो आणि परिस्थितीला एक धक्कादायक वळण मिळते. आयत्या वेळी तो इसम परीक्षेचा पेपर चोरण्याची सूचना आपल्याला पुष्पाने दिली असल्याचा आरोप करतो. शेजारीपाजारी या आरोपामुळे बावचळून जातात.

## ज्युनिपर ग्रीन एनर्जीने ३,००० कोटींच्या आयपीओसाठी सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

**मुंबई, ३ जुलै :** ज्युनिपर ग्रीन एनर्जी लिमिटेड ही भारतातील एक आघाडीची स्वतंत्र नवीकरणीय ऊर्जा उत्पादक कंपनी आहे. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या एकूण क्षमतेच्या आधारे, ही कंपनी देशातील टॉप १० आयपीपी कंपन्यांमध्ये मोडते. एकूण क्षमता यामध्ये कार्यरत, बांधकामाधीन, करारबद्ध व मिळालेल्या प्रकल्पांचा समावेश आहे. कंपनी आपले युटिलिटी स्केल नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प स्वतःच्या आणि टीमच्या साहाय्याने विकसित, उभारते, चालविते आणि देखभाल करते. कंपनीचा महसूल विविध वीज खरेदीदारांना ज्यामध्ये केंद्र व राज्य सरकारच्या पाठबळाची संस्थाही असतात वीज विकून मिळतो.

ज्युनिपर ग्रीन एनर्जी लिमिटेडने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड कडे दाखल केला आहे. कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री द्वारे ३,००० कोटी (३०,००० दशलक्ष) उभारण्याचा प्रस्ताव ठेवला आहे, ज्यामध्ये प्रत्येकी १० दर्शनी मूल्याचे इक्विटी शेअर्स जारी केले जाणार आहेत. या ऑफरमध्ये ३,००० कोटी (३०,००० दशलक्ष)पर्यंतच्या नवीन इक्विटी शेअर्सच्या इश्यूचा समावेश आहे. कंपनी निव्वळ उत्पन्नाचा उपयोग खालील उद्दिष्टांसाठी करण्याचा प्रस्ताव ठेवते कंपनीने घेतलेल्या काही कर्जाचे संपूर्ण किंवा अंशतः पुनर्भरण / पूर्वनिर्धारित फेड, यासाठी अंदाजे १०९२.२७ कोटी (१०,९२२.७१ दशलक्ष) खर्च होईल. कंपनीच्या महत्त्वाच्या उपकंपन्यांमध्ये (Material Subsidiaries) — Juniper Green Gamma One Private Limited, Juniper Green Three Private Limited, Juniper Green Field Private Limited, Juniper Green Beam Private Limited, तसेच उपकंपन्या Juniper Green Kite Private Limited आणि Juniper Green Ray Two Private Limited यांना त्यांच्या काही प्रलंबित कर्जाच्या संपूर्ण किंवा अंशतः पुनर्भरणासाठी भांडवल गुंतविणे, यासाठी अंदाजे ११५७.७२ कोटी (११,५७७.२९ दशलक्ष) खर्च अपेक्षित आहे. उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट गरजांसाठी वापरण्यात येईल.

ज्युनिपर ग्रीन एनर्जी लिमिटेडने मार्च २०२० मध्ये १०० मेगावॅट (१४४.९७ मेगावॅट पीक) क्षमतेचा आपला पहिला सौरऊर्जा प्रकल्प सुरू केला. त्यानंतर, कंपनीने आपल्या प्रकल्पांचा पोर्टफोलिओ वाढवून ३१ मे २०२५ पर्यंत एकूण ७,८९८.४५ मेगावॅट (१०,०६९.५८ मेगावॅट पीक) क्षमतेपर्यंत विस्तार केला आहे. सौरऊर्जा प्रकल्पांव्यतिरिक्त, ज्युनिपर ग्रीनच्या पोर्टफोलिओमध्ये वाऱ्याच्या ऊर्जा प्रकल्पांसोबतच डब्ल्यूएसएच आणि एफडीआरई अशा गुंतागुंतीच्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांचा व यांसारख्या बॅटरी ऊर्जा संचयन प्रणालींचा समावेश आहे. CRISIL रिपोर्टनुसार, १ एप्रिल २०२१ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या डब्ल्यूएसएच आणि एफडीआरई टेंडर्समध्ये ज्युनिपर ग्रीन ही एकूण क्षमतेच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकावर असलेली सर्वात मोठी बोलीदार कंपनी आहे आणि या टेंडर्समध्ये १००% प्रकल्प रूपांतरित करण्यात यश मिळविले आहे.

## आज का अंदाज

शुक्रवार ४ जुलै २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| १३८ | १४० | ४४० | २७० | ११० | १६६ | ४५७ | १७९ |
| ३४५ | २५८ | २८८ | ४६९ | ५८९ | २२९ | २४० | ३५९ |
| २४६ | ३५७ | ५६७ | ३७९ | ३९० | ३३७ | ६०० | २२३ |
| २४ | ५४ | ८१ | ९१ | २४ | ३४ | ६८ | ७८ |
| २६ | ५६ | ८० | ९० | २० | ३० | ६९ | ७९ |
| २८ | ५८ | ८७ | ९७ | २१ | ३१ | ६५ | ७५ |

४ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ४१ | ५२ | ७२ |
| ३० | ४० | ५६ | ७६ |
| ३९ | ४९ | ५८ | ७८ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## वीर हनुमान मालिकेत हनुमान श्रीरामासाठी बनला संकटमोचन

**मुंबई, २ जुलै :** सोनी सबवरील वीर हनुमान मालिका त्यातील भावनिक आणि दमदार कथानकामुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. या मालिकेत आन तिवारी छोट्या हनुमानाच्या भूमिकेत आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीची भूमिका करत आहेत. माहिर पांधी वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका करत आहे आणि तन्मय ऋषी शाह बाल श्रीरामाच्या भूमिकेत दिसत आहे. कथानक आता एका नाट्यमय आणि हृदयस्पर्शी टप्प्यावर पोहोचले आहे. आत्तापर्यंत प्रेक्षकांनी पाहिले की, इंद्रदेवाने (मीर अली) पाठवलेले एक भयंकर वादळ अयोध्येच्या दिशेने येत आहे. अशा वेळी श्रीराम प्रजेच्या रक्षणार्थ पुढे येतात आणि त्यांचा एकनिष्ठ भक्त हनुमान त्यांना साथ देतो. त्यावेळी एका महत्त्वाच्या क्षणी श्रीराम हनुमानाची दैवी ताकद आणि भक्ती पहिल्यांदा अनुभवतात. आणि येथून त्यांच्या विश्वास आणि धैर्याच्या अजरामर नात्याची सुरुवात होते.

आगामी भागांमध्ये अयोध्येला धोक्यात टाकल्याबद्दल हनुमान इंद्राला जाब विचारतो. हनुमानाचा हा निर्धार पाहून अग्नी देवाला तो त्याचा अहंकार वाटतो आणि अग्नीदेवाचा त्याच्यावर कोप होतो. रागाच्या भरात अग्नीदेव एका ज्वालामुखीच्या रूपात फुटतात, ज्याच्यात श्रीराम आणि लक्ष्मण (धनिक्ष दधीच) अडकतात. यावेळी हनुमानच आपल्या सामर्थ्याने त्यांना वाचवू शकतो.

वीर हनुमान मालिकेत हनुमानाची भूमिका करणारा आन तिवारी म्हणतो, ही दृश्ये करायला मला फारच मजा आली, कारण यात हनुमनाला श्रीराम आणि लक्ष्मणाचा बचाव करण्याची संधी मिळते. ते खूप मोठे साहस केल्यासारखे वाटले. श्रीराम जेव्हा अडकतात, तेव्हा हनुमान हार मानत नाहीत आणि त्यांना मदत करतात. शौर्य हेच तर असते- काहीही झाले तरी मागे न हटता आपल्या माणसांना मदत करणे.

## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही वादात पडू नका, तुम्हालाच त्रास होईल. तुमच्या वैयक्तिक योजना तुमच्या विरोधकांना कळू देऊ नका. खाजगी व्यवसायात गुंतलेल्या लोकांना अचानक मोठे यश मिळू शकते.

**वृषभ :** आज कुटुंबात अनावश्यक वाद होऊ शकतात. वडिलोपार्जित मालमत्तेशी संबंधित प्रकरण खटल्यात जाऊ शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या कठोर शब्दांमुळे लोकांना त्रास होईल.

**मिथुन :** कौटुंबिक समस्यांमुळे तणाव वाढू शकतो, धीर धरा. व्यवसाय क्षेत्राशी संबंधित लोकांना अचानक लाभ मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात आणखी काही संघर्ष होऊ शकतात.

**कर्क :** उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडतील. न्यायालयीन प्रकरणांमध्ये निष्काळजीपणा महागात पडू शकतो. प्रवास करताना काळजी घ्या. नोकरीत आनंद, पदप्रतिष्ठा वाढेल. तुम्हाला काही नवीन जबाबदारी मिळू शकते.

**सिंह :** कला, अभिनय क्षेत्राशी संबंधित लोकांना मोठे यश मिळेल. घरात चैनीच्या वस्तूंचे आगमन झाल्याने कुटुंबात आनंद पसरेल. विवाहित लोकांना त्यांच्या जोडीदारासोबत निवांत वेळ घालवता येईल.

**कन्या :** आज इच्छा नसतानाही तुम्हाला लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी अधिक उत्साहाने आणि सकारात्मकतेने काम करण्याची गरज भासेल. वरिष्ठांशी समन्वय राखण्याचा प्रयत्न करा.

**तुळ :** आज नोकरीत पदोन्नती होईल आणि महत्त्वाच्या जबाबदारीचा लाभ मिळेल, पगार वाढण्याचीही शक्यता आहे. सरकारी सत्तेचा लाभ तुम्हाला मिळेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**वृश्चिक :** आज व्यवसायात अचानक वाद होऊ शकतो. त्यामुळे मन दु:खी होईल. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. शास्त्रज्ञ किंवा संशोधकांना मोठे यश मिळेल.


**धनु :** आज तुमच्या बौद्धिक क्षमतेचे आणि अनुभवाचे कौतुक होईल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. राजकारणात महत्त्वाचे पद मिळण्याची शक्यता आहे. मुलांच्या वागण्याने आनंद वाढेल.

**मकर :** आज राजकीय क्षेत्रातील उच्चपदस्थ व्यक्तीकडून लोकांना सहकार्य मिळेल. काही महत्त्वाची प्रलंबित कामे पूर्ण होण्याचे संकेत मिळतील. तुमच्या कार्यक्षमतेने शत्रू प्रभावित होतील.

**कुंभ :** क्रीडा स्पर्धांमध्ये अपयश मिळण्याची शक्यता आहे. यामुळे तुम्ही दु:खी होऊ शकता. पण खचून जाऊ नका, तुमचे वर्तन अधिक सकारात्मक बनवण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल.

**मीन :** व्यवसायात आर्थिक लाभाच्या संधी कमी होतील. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. उद्योग विस्तारण्याची योजना यशस्वी होईल. घराबाहेर पडताना नीट काळजी घ्या, वेगाने गाडी चालवू नका.

## शब्दकोडे क्रमांक २१५४




**आडवे शब्द :-**
१) तळे
३) नवरा
५) उपदेश
६) सजावट
८) आणि
९) विशेष
१०) मीठ
१२) *** निर्यात
१४) मनाची फिरणारी इच्छा
१६) राक्षसी, डाकीण
१७) कपाळ
१८) आकाशयान
२०) पोर्णिमाच्या विरुद्ध
२१) सर, हार
२३) रस्ता
२४) अग्नी
२६) आश्चर्य
२७) एक आदिवासी जमात
२९) मिठी, विळखा
३०) राक्षस
३१) चणचण, न्यूनता
३४) मोठे माकड
३६) घागरा
३७) व्यवस्थित
३८) पावसाची झड
४०) युद्ध
४२) एक धान्य
४४) माल साठविण्याची जागा
४५) चांगली वागणूक
४८) टपाल (इं)
५१) हत्ती
५३) बाजाराचा
५५) झाडाची पाने, काटक्या इ
५७) बोकड
५९) म्हैस, शिवाय
६१) बारीक, पातळ खांब
६२) भगर
६३) अरण्य
६४) सरळ लांब बांबू
६६) पर्ण
६९) राखेचा ढीग
७२) दिवस
७३) अधिक महिना
७४) राजसुख
७६) तरतरी आणणारे एक उष्ण पेय
७७) सरोज
७८) रक्कम, ठराविक पैसे
७९) पहाटे म्हणण्याचे गाणे

**उभे शब्द :-**
१) मसाल्यातील पान
२) सरपणाचे दुकान
४) अरण्यवास
५) च्यासह,
६) सिंहाच्या मानेभोवतीचे केस
७) रजनी
११) चामखीळ
१२) आकाश
१३) पुष्कळ
१५) यज्ञ, यज्ञात टकण्याची आहुती
१६) पेरणी, एक गीत प्रकार
१९) नाकावरील एक मोत्याचा दागिना
२१) श्रीमंत
२२) दह्याचे पातळ पेय
२४) शेळी
२५) छोटासा
२६) लग्नाचा मुलगा
२७) मागमूस, पत्ता
२८) कणीदार पीठ
२९) बशीचा जोडीदार
३२) धमनी
३३) उत्तराधिकारी
३५) दारूचा एक प्रकार
३९) निकट
४१) धातूचा द्रव
४३) सलोखा, ऐक्य
४६) अवस्था, स्थिती
४७) पर्वत
४९) अर्धांगवायू
५०) शेगांवचा एक प्रसिद्ध खाद्यपदार्थ
५२) अळशी नावाचे धान्य
५३) पराभव
५४) पृथ्वी
५६) शुद्ध, पवित्र
५७) दुष्काळ, संकट
५८) लोक, प्रजा
६०) फणसातील खाद्यभाग
६५) रोकड
६६) सरबत, पेय (सं.)
६७) आजच्या आधीचा दिवस
६८) विश्रांती
७०) सूड
७१) कोवळी फांदी
७३) घाण
७५) छाती

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य ५ जुलै रोजी चंद्रपूरमध्ये

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य वड्डेपल्ली रामचंदर हे ५ जुलै रोजी चंद्रपूर येथे येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शनिवार दि. ५ जुलै रोजी दुपारी २.३० वाजता चंद्रपूर येथे आगमन व शहरातील रयतवारी कॉलरी येथे नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेऊन ते सामाजिक संघटनांसोबत चर्चा व सायंकाळी ६ वाजता चंद्रपूरवरून प्रस्थान करतील.

## धरती आबा अभियानाचा ५ जुलैला कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** आदिवासी भागांमध्ये सेवा आणि पायाभूत सुविधांची परिपूर्णता सुनिश्चित करणे, हा प्रधानमंत्री धरती आबा जनभागीदारी अभियानचा प्रमुख उद्देश आहे. या अभियानामध्ये शासनाच्या १७ विभागांच्या २५ सेवांचा समावेश करण्यात आला असून ५ जुलै २०२५ रोजी पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत प्रत्यक्ष ग्रामस्तरावर शिबिरांच्या माध्यमातून आधारकार्ड, रेशनकार्ड, आयुष्मान भारतकार्ड, जातीचे प्रमाणपत्र, पीएम-किसान, जनधनखाते, काढणे अशा सेवा देण्यात येणार आहेत.

# ख्रिश्चन बांधवाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** चंद्रपूर जिल्हा खिश्चन समाजाच्या वतीने आज दि. ३ जुलै रोजी ११ वाजता चर्च येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



चंद्रपूर जिल्हा खिश्चन समाजाचे प्रतिनिधी म्हणून निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, ख्रिश्चन समाज नेहमीच शांततेने, अहिंसेने व सर्व धर्माशी सलोखा ठेवून सामाजिक व धार्मिक कार्य करीत आला आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५ नुसार प्रत्येक नागरीकास स्वतःचा धर्म पाळण्याचा, त्याचा प्रचार करण्याचा व प्रसार करण्याचा मुलभूत अधिकार आहे. पाद्री हे समाजातील लोकांना धार्मिक शिक्षण देण्याचे व शांततेचा संदेश पसरविण्याचे कार्य करतात. मात्र अलीकडच्या काळात आमच्या धर्मगुरुंना म्हणजेच पाद्रींना खुलेआम जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. दिनांक १७ जुन रोजी सांगली येथे झालेल्या एका मोर्चात आमदार गोपीचंद पडळकर यांनी सार्वजनिकरित्या 'जो पाद्रीला ठार मारेल त्याला ११ लाख रुपये दिले जातील' असे विधान करुन थेट खून करण्यास लोकांना प्रवृत्त केले आहे.हे केवळ भारतीय दंड संहितेच्या दृष्टीने गंभीर गुन्हा आहेच. पण भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकारांना थेट विरोध करणारे आहे. सांगली जिल्ह्यातील बहिण रुतुजा राजगे यांच्या आत्महत्येप्रकरणी आम्हीही न्यायाची मागणी करतो.घरगुती हिंसाचारामुळे ७ महिन्याच्या गरोदर अवस्थेत त्यांनी टोकाचं पाऊल उचलावं लागणं हे अत्यंत दुर्दैवी आहे. संबंधित घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी व्हावी आणि दोषी कोणताही असो- त्याला कायदयानुसार कठोर शिक्षा मिळावी. ही आमची ठाम मागणी आहे. पण आम्ही याचबरोबर हेही स्पष्ट करु इच्छितो की, या वैयक्तिक व कौटुंबिक शोकांतिकेला धार्मिक वळण देऊन समाजात तेढ निर्माण करण्याचा जो प्रयत्न आमदार गोपीचंद पडळकर करत आहेत. तो अत्यंत निंदनीय आहे. हा विषय न्यायव्यवस्थेच्या आधारे सोडवावा.पण धर्माच्या नावावर द्वेष पसरवू नये एक लोकप्रतिनिधी म्हणून आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडून जबाबदारीने वागण्याची अपेक्षा होती.मात्र त्यांनीच खुलेआम लोकांना हिंसेसाठी प्रवृत्त करुन कायदा आणि लोकशाही दोघांनाही धक्का दिला आहे.

त्यामुळे आमच्या मागण्या आहेत- दिनांक १७ जुन रोजीच्या भडकाऊ वक्तव्याबदद्ल आमदार गोपीचंद पडळकर यांच्याविरुध्द तात्काळ गुन्हा दाखल करुन कठोर कायदेशिर कारवाई करण्यात यावी. त्यांनी आमदार या पदाचा दुरुपयोग करुनसमाजात तेढ व हिंसाचार पसरविल्यामुळे त्यांची आमदारकी तात्काळ रद्द करण्यात यावी. ख्रिश्चन समाजाला आणि पाद्रींना योग्य पोलिस संरक्षण देण्यात यावे.

सिस्टर रुतुजा राजगे आत्महत्येप्रकरणी सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी व जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायदयानुसार कठोर शिक्षा करण्यात यावी. या प्रकरणाला धार्मिक वळण देण्याचा जो प्रयत्न केला जात आहे त्याचा निषेध करण्यात यावा आणि अशा समाज विद्यातक प्रवृत्तीवर त्वरित नियंत्रण आणण्यात यावे. आपण या निवेदनास अत्यंत गांभीर्याने घेऊन त्वरित आवश्यक ती कार्यवाही करावी. ख्रिश्चन समाजाच्य वतीने रेव्ह प्रभाकर कन्डे रेव्ह. राजे रामिला. राजु गुनगंटीवार, रोशन तीरसुले, राजु कान्नुरी, दानंजय काम्पेल्ली, प्रतिक परागे, प्रकाश भागत, विजय अर्नाकोंडा, सुवार्तिक वासेकर, पास्टर संध्या मालापती, मोहन सक्सेना, प्रशांत साठे, अनुराग निर्मल, राजेश कलवल आदी मोर्चात सहभागी झाले होते.

# पोंभूर्णा एमआयडीसीच्या निर्माणाचा मार्ग मोकळा !

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला यश
## उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सभागृहात दिले आश्वासन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा येथे एमआयडीसी होण्यासाठी २००९ पासून सातत्याने पाठपुरावा केला. पंधरा वर्षांच्या या संघर्षाला अखेर यश आले आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात उद्योग राज्यमंत्री इंद्रनीलजी नाईक यांनी पोंभूर्णा एमआयडीसी वर्षभरात सुरू करण्याचे स्पष्ट आश्वासन आ. मुनगंटीवार यांना दिले.

या मुद्द्यावर अर्धा तास झालेल्या चर्चेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आतापर्यंतच्या पाठपुराव्याची आठवण करून दिली. एनओसी, नकाशा, नाहरकत प्रमाणपत्र, बैठकांचे इतिवृत्त आणि कालबाह्य प्रक्रियांमुळे हा प्रकल्प कसा लांबणीवर पडला, हे त्यांनी तपशीलवार मांडले. यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्री महोदयांकडे चार ठोस मागण्या करत लक्ष वेधले. संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक तत्काळ घेणे, चंद्रपूर जिल्ह्यातच राज्य उद्योग मित्र नेमावा, मंत्री महोदयांनी चंद्रपूर दौरा करून प्रत्यक्ष पाहणी करावी, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात वाढ करावी, या मागण्यांचा यामध्ये समावेश होता.

उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी यावेळी सकारात्मक भूमिका घेत पोंभूर्णा एमआयडीसीसाठी १०२.५० हेक्टर भूसंपादन प्रस्तावाला मान्यता मिळाल्याची माहिती दिली. या अंतर्गत ४२.५९ हेक्टर शेतकऱ्यांशी थेट खरेदी करून २ कोटी ३५ लाखांचा मोबदला दिला गेला आहे. उर्वरित जमिनींसाठी ३३/३ ची नोटीस जारी करण्यात आली आहे. आ.सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागण्याबाबत मंत्री नाईक म्हणाले, 'यासंदर्भात अधिवेशन कालावधीतच बैठक आयोजित केली जाईल. चंद्रपूर येथे राज्य उद्योग मित्र नेमण्यात येईल. उर्वरित भूसंपादन प्रक्रिया ६० दिवसांत पूर्ण केली जाईल आणि अधिकाऱ्यांकडून दर आठवड्याला प्रगती अहवाल आमदार श्री. मुनगंटीवार यांना सादर केला जाईल. जमिनीच्या दरांसंदर्भात लवकरच बैठक घेण्यात येईल.' यासोबतच पुढील महीन्यात मी स्वतः चंद्रपुरात येतो, असे आश्वासनही राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी यावेळी दिले.

# आ. सुधीर मुनगंटीवार ठरले 'पॉवरफुल्ल'!

## बल्लारपूर मतदार संघातील पोंभुर्णा येथील १६७ कोटी रुपयांच्या पाच कामांना मंजुरी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एकूण राज्यातील कामांमध्ये बल्लारपूर विधानसभा सर्वाधिक पुढे

बल्लारपूर विधानसभेच्या पाच कामांना मिळालेली मान्यता ही आकड्यांमधील यशाची केवळ एक झलक आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांची नेतृत्वशैली ही निर्णयक्षम, अभ्यासपूर्ण आणि परिणामकारक आहे. त्यामुळेच चंद्रपूर जिल्ह्याचा चेहरा बदलणारी ही कामगिरी 'पॉवरफुल्ल' ठरत आहे, हे विशेष.

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच बल्लारपूर विधानसभेचे आमदार आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा आपल्या प्रभावी नेतृत्वाची ठसठशीत छाप सोडली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने संपूर्ण महाराष्ट्रात मंजूर केलेल्या एकूण आठ कामांपैकी १६७ कोटी रुपयांची तब्बल पाच कामे बल्लारपूर विधानसभेसाठी मंजूर झाली आहेत. आ. मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच शक्य झाले आहे.



थेट संवाद, स्पष्ट मागणी, प्रभावी पाठपुरावा आणि प्रशासनावर पकड ही आ. मुनगंटीवार यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये आहेत. सभागृहात त्यांनी वारंवार दिलेले मुद्देसूद आणि तडाखेबाज भाषण, तसेच प्रत्यक्षात निधी खेचून आणण्यातली तंत्रशुद्ध कामगिरी, यामुळेच त्यांनी हा ठसा उमटवला आहे. नेतृत्व कसे असते, हे त्यांनी पुन्हा सिद्ध करून दाखवले आहे.

या मंजूर कामांसाठी १६७ कोटींच्या पुढील निधीची तरतूद आहे. यामध्ये पोंभुर्णा शहरातील अनेक विकासकामांना गती मिळणार आहे. यामुळेच आ. सुधीर मुनगंटीवार यांची ठाम, अभ्यासू व परिणामकारक नेतृत्त्वशैली पुन्हा अधोरेखित झाली आहे.

**या कामांचा समावेश**

चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यात मरेगाव-राजगड-गडीसूर्ला-थेरगाव-वढोली-घाटकुल रस्ता (घाटकुल ते भीमनी फाटा) आणि केळझर स्टेशन ते सुशी नवेगाव भुज कोरंबीपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकामासाठी ४५ कोटी रूपये मंजुर.

बल्लारपूर मतदारसंघातील आक्सापूर ते चिंतलधाबा रस्त्याच्यामध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे व दोन लहान पुलांचे बांधकामासाठी ५० कोटी रूपये मंजुर.

चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील मरेगाव-आकापुर-राजगड-फिस्कुटी-गडीसूर्ला-भेजगाव-सिंताळा-थेरगाव-वेळवा-सोनापूर-चेक-बल्लारपूर-वढोली-घाटकुल रस्त्याचे बांधकाम. घाटकुल येथे भूसंपादनासह वळणमार्गाचे बांधकामासाठी १७ कोटी रुपये मंजूर.

चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील कोसारा-सोईट-वरोरा-मोहोर्ली चंद्रपूर-जुनोना-गिलीबीली-पोंभुर्णा-नवेगाव-मोरे रस्त्याचे बांधकाम. या रस्त्यावर मोठ्या पुलाचे व पोचमार्गाचे भूसंपादानासह बांधकाम करणे तसेच सेवावाहिन्या स्थलांतरित करण्यासाठी ४० कोटी रुपये मंजूर.

चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील जुनोना-गिलबिली-सातारा-तुकूम-पोंभुर्णा-नवेगावमोरे रस्ता व नवेगावमोरे येथे वळणमार्गाचे भूसंपादनासह बांधकामासाठी १५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे.या सर्व कामासाठी एकूण १६७ कोटी रुपये इतका मोठा निधी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मंजुर झाला आहे.

संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली यापूर्वी अफाट विकासकामे करून आ. मुनगंटीवार यांनी कार्यक्षमतेचे शिखर गाठले आहे. सैनिकी शाळा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वन प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वन अकादमी), बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, बॉटनिकल गार्डन, कॅन्सर हॉस्पीटल उभे राहत आहे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, ए.न.ऊ.ऊ. महिला विद्यापीठाचे केंद्र, डायमंड कटिंग सेंटर, सोमनाथ (मुल) कृषी महाविद्यालयाला मंजूरी, पोंभुर्णा येथे बांबू हॅंडीक्राफ्ट व आर्ट युनिट, टूथपिक उत्पादन केंद्र, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उद्यान, आगरझरी – बटरफ्लाय गार्डन, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी इको पार्क, अजयपूर – शेतकरी प्रशिक्षण केंद्र, प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहाचे आधुनिकीकरण, चंद्रपूर फ्लाइंग क्लब सुरु झाले, बल्लारपूर येथे सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र लवकरच सुरु होत आहे,आदी कामे आ. मुनगंटीवार यांनी केलेली आहे.

# भाजपाच्या राजुरा ग्रामीण तालुका प्रमुख पदी वामन तुरानकर यांची निवड

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ३ जुलै :** नुकतेच भाजपाने चंद्रपूर जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील प्रमुखांची निवड यादी प्रकाशित करण्यात आली. राजुरा तालुका ग्रामीण प्रमुख म्हणून नौकरी खुर्द येथील रहवासी वामन तुरानकर यांची निवड करण्यात आली. वामन मारोती तुरानकर हे सध्या नोकारी( खु.) गावातील उपसरपंच पदावर आहे. तसेच१९९७ पासुन भाजपचे सक्रीय कार्यकर्ते आहे.



त्यांनी भाजपा तालुका उपाध्यक्ष, तालुका महामंत्री, जिल्हा कामगार संघटना सचिव, संजय गांधी निराधार समीती सदस्य, जिल्हा नियोजन समीती सदस्य ,पंतप्रधान विश्वकर्मा योजना विधान सभा प्रमुख अशी विविध पदावर कामे केलेली आहे. भाजप पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे त्यावर खरा उतरण्याचे मी कसोशीने प्रयत्न करील अशी प्रतिकिया वामन तुरानकर यांनी व्यक्त केली.

त्यांच्या निवडी बद्दल डॉ अशोक उईके पालकमंत्री चंद्रपूर, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आमदार देवराव भोंगळे, जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, विवेक बोडे जिल्हा महामंत्री तथा राजुरा विधानसभा प्रमुख, माजी तालुकाध्यक्ष सुनील उरकुडे, विनायक देशमुख, मधुकर नरड, संजय उपगंलावार, भाऊराव चंदनखेडे ,तालुका महामंत्री बाळानाथ वडस्कर , तालुका महामंत्री दिलीप गीरसावळे ,युवा मोर्चाचे अध्यक्ष अजय राठोड, महिला आघाडी अध्यक्ष मंजुषा अनमोलवार ,राजुरा शहराचे अध्यक्ष सुरेश रागीट, युवा मोर्चाचे अध्यक्ष प्रफुल घोटेकर, महिला आघाडी अध्यक्ष मायाताई धोटे विनोद नरेंद्रवार समस्त भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या मागणी नंतर कामगार मंत्री चंद्रपुरासाठी घेणार विशेष बैठक

## पावसाळी अधिवेशनात आ. जोरगेवार यांची मागणी, कामगारांचे प्रश्न लागणार मार्गी.

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** अनेक औद्यागीक संस्थांनी सुरक्षारक्षकांची मागणी केली आहे. ते नौकरी देण्यास तयार आहे. मात्र सुरक्षा रक्षक मंडळ कामगारांची नोंदणी करुन घेत नसल्याने नोंदणीकृत कामगारांची संख्या कमी आहे. परिणामी मागणी असूनही कामगार पूरवता येत नसल्याचा आरोप करत सूरक्षारक्षक मंडळाने तात्काळ सुरक्षा रक्षकांची नोंदणी करावी याबाबत कामगार मंत्री यांनी चंद्रपूरसाठी बैठक लाववी अशी मागणी पावसाळी अधिवेशनात बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. आहे. यावर अधिवेशन संपताच विशेष बैठक घेण्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी मान्य केले आहे.



पावसाळी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या सत्रात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगारांचा प्रश्न उपस्थित करून येथील सुरक्षारक्षकांच्या समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावर उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी अधिवेशन संपल्यानंतर या संदर्भात विशेष बैठक घेण्यात येईल, असे सांगितले. त्यामुळे औद्योगिक जिल्हा असलेल्या चंद्रपूरमधील कामगारांचे प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात सध्या ५० हजारांहून अधिक कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. मात्र त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारी सक्षम यंत्रणा अद्याप अस्तित्वात नाही. अनेक आस्थापनांनी आपल्या सुरक्षारक्षकांची नोंद केली असली, तरी प्रशासनाकडून त्यांच्या नोंदणीबाबत उदासीनता आहे. परिणामी, या कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे चंद्रपूर येथे विशेष बैठक घेऊन कामगारांचे प्रश्न सोडवावेत, अशी मागणी पावसाळी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.

आज विधीमंडळात या मुद्द्याकडे लक्ष वेधताना आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे विशेष मागणी करत सांगितले की, चंद्रपूर जिल्ह्यातील कंत्राटी कामगार, विशेषतः सुरक्षारक्षक यांच्या नोंदणी प्रक्रियेत अपुऱ्या यंत्रणेचा फटका कामगारांना बसतो. त्यामुळे या कामगारांचे हक्क आणि कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. कामगार मंत्री यांनी स्वतः चंद्रपूर जिल्ह्याला भेट द्यावी, स्थानिक अधिकाऱ्यांसोबत बैठक घ्यावी आणि या कामगारांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

या मागणीला उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, लवकरच चंद्रपूर जिल्ह्यातील कामगार समस्यांवर विशेष बैठक घेण्यात येईल. तसेच सुरक्षारक्षक कामगारांची नोंदणी करण्याचे आदेश दिले जातील असेही त्यांनी स्पष्ट केले. यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो कंत्राटी कामगारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले जाणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ने. हि. विद्यालयात शालेय गणवेश व बॅग वाटप कार्यक्रम संपन्न

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ३ जुलै :** स्व. किसनलाल मदन गोपलजी भैया फॉउंडेशन तर्फे, नेवजाबाई हितकारणी विद्यालय, नवेगाव पांडव येथील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व बॅग वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोकजी नेवजाबाई हितकारणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया होते. त्यांनी स्वतः उपस्थित अतिथींसह विद्यार्थ्यांना गणवेश वितरित करून त्यांचा उत्साह द्विगुणित केला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून गुरूदेव छात्रालयाचे अध्यक्ष विठ्ठलरावजी बोरकुटे, माजी विदयार्थी तथा राज्य पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष प्रा.महेश पानसे, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी कमलाकरजी पांडव तसेच ङ मुख्याध्यापक वी. सी. भैय्या यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व बॅगचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद त्यांच्या समाधानाची साक्ष देत होता. कार्यक्रमाची सांगता सर्व मान्यवरांचे आभार मानून करण्यात आली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका नवघडे मॅडम व आभार शिक्षक बुल्ले यांनी केले.

## अर्णव पाथ्रीकर दिल्ली येथे सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**

**भोयगाव, दि. ३ जुलै :** महात्मा गांधी विद्यालय गडचांदूर येथील सेवानिवृत्त प्राचार्य स ु भ ा ष पाथ्रीकर,प्रतिभा पाथ्रीकर, ह.मु.अकोला,याचानातू अर्णव अभिषेक पाथ्रीकर प्रभात किड्स अकोला,येथील फर्स्ट स्टॅंडर्डचा विद्यार्थी,याने 'स्पेल वेल इंडिया' या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर प्रथम येण्याचा मान पटकाविला असून तो चॅम्पियन ठरला आहे.



आय.आय.सी.दिल्ली,येथे नुकताच स्पेल वेल इंडियाचे मान्यवर संचालक यांचे हस्ते एका शानदार सोहळ्यात त्याचा गौरव करण्यात आला.सन्मान चिन्ह,प्रशस्तीपत्र,८ हजार रुपये रोख,असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

अर्णव हा माहेर कलेक्शनचे संचालक अभिषेक पाथ्रीकर, रेणू पाथ्रीकर यांचा मुलगा तसेच सेवानिवृत्त प्राचार्य स ु भ ा ष पाथ्रीकर,प्रतिभा पाथ्रीकर,जे.टी. कराळे, अकोला यांचा नातू आहे.स्कुल ऑफ स्कॉलर्स च्या प्राचार्या मनीषा उंबरकर,प्रभात किड्स चे संचालक डॉ.गजाननराव नारे यांनी अभिनंदन केले आहे.अर्णव चे सर्व स्तरावर कौतुक व अभिनंदन होत आहे.

## भारतीय लॉयड्स मेटल्स कामगार संघाची संघटनात्मक चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ३ जुलै :** घुग्घुस येथील भारतीय लॉयड्स मेटल्स कामगार संघ दि.१ जुलै २०२५ मंगळवार रोजी भा.लॉ.मे.का.संघ कार्यालयात नवनियुक्त पदाधिकारीची संघटनात्मक चर्चा करण्यात आली. सर्वप्रथम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भारतमाता,भगवान विश्वकर्मा व संस्थापक दंत्तोपती ठेंगडी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. सामुहिक संघटनचे गीत गायण करण्यात आले.



अध्यक्ष विवेक अल्लेवार याच्या मार्गदर्शनात विविध कामगार कर्मचारीचे समस्या मांडण्यात आले.लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड कंपनीतील स्थायी,अस्थाई कर्मचारी कामगाराचे लवकरात लवकर समस्याचे निर्वारण होणार. याप्रसंगी नवनियुक्त भारतीय लॉयड्स मेटल्स कामगार संघाचे अध्यक्ष विवेक अल्लेवार,महामंत्री प्रशांत कौरासे, कार्याध्यक्ष राजेंद्र क्षिरसागर, संयुक्त महामंत्री राजास्वामी जंगम, कोषाध्यक्ष विनोद पिंपळशेंडे,मनोज कोंडेकर, प्रमोद येलचलवार, रविन्द्र ठाकरे,शंकर बरडे,युसुफ शेख, मंगेश राजुरकर,अविनाश बुटले, संतोष चिंत्तला,पृथ्वीराज आगदारी, विजय माथणकर, परशुराम उगे व प्रसिद्ध प्रमुख पंकज रामटेके आदी उपस्थित होते.

## विश्वकर्मा कॉलनी येथे भजन स्पर्धेचे प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जुलै :** विश्वकर्मा कॉलनी गजानन महाराज मंदिर येथे सावित्रीबाई फुले गुरुदेव सेवा भजन मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या स्पर्धेचे प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम मोजरीचे केंद्रिय प्रतिनिधी ह.भ.प ढवस महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ५ वाजता संपन्न झाला.



यावेळी महाराजांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याच्या जीवनावर व कार्यावर प्रकाश टाकला तसेच सामुदायिक प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमासाठी रवींद्र शेंदूरकर तसेच गुरुकुंज आश्रम मोजरी येथील महिला प्रतिनिधी नलिनीताई निखाडे, माजी नगरसेविका वंदना तिखे यांनी मार्गदर्शन केले.व उपस्थितीत मान्यवरांनी आपल्या अमृतमय वाणीतून प्रबोधन केले. या कार्यक्रमाचे संचालन योगाचार्य मधुकर राजूरकर यांनी केले या कार्यक्रमासाठी जयश्री सोनुले मॅडम व येरणे मॅडम यानी हा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले महिला भजन मंडळ व जगन्नाथ बाबा महिला भजन मंडळाच्या सर्व सदस्या तसेच वार्डातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. आभार जयश्री सोनुले यांनी मानले.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ ※ स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी ※ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# अस्मिता

## घरच्या करीला हॉटेलचा स्वाद

रसगंधा

हॉटेलमधल्या भाज्या सगळ्यांनाच आवडतात. मग अशा भाज्या घरच्या घरीच करता आल्या तर सोने पे सुहागा. चला तर मग, आज मशरूम करी करु या.



**साहित्य :** मशरुम २०० ग्रॅम, एक कांदा, एक टोमॅटो, चार लसूण पाकळ्या, १५ काजू, एक इंच आलं (किसून घ्या), अर्धा चमचा लाल तिखट, दोन चमचे तेल, थोडी कोथिंबिर, अर्धा चमचा गरम मसाला, मीठ इत्यादी.

**कृती:** काजू पाण्यात दहा मिनिटं भिजवून ठेवा आणि मिक्सरमध्ये वाटून पेस्ट बनवा. मशरूम धुवून देठ कापून घ्या. आता कढईत तेल गरम करून मशरुम घाला. तीन ते पाच मिनिटं शिजवून घ्या. आता मशरूम बाजूला ठेवा. त्याच कढईत आणखी तेल घाला. यात कांदा घालून सोनेरी रंगावर परतून घ्या. त्यात आलं आणि लसूण घाला. मग टोमॅटो घालून शिजवून घ्या. आता त्यात लाल तिखट, मीठ आणि काजूची पेस्ट घाला. नीट मिसळून घ्या. शेवटी मशरुम आणि गरम मसाला घालून शिजवा. गरजेनुसार पाणी घाला. वरून कोथिंबिर घाला. ही करी पोळी किंवा पराठ्यासोबत खाता येईल.

## मिळवा शाही टच

ॲक्सेसरीज



पोटली क्लच बॅग्ज लग्न किंवा कोणत्याही पारंपरिक समारंभासाठी योग्य ठरतात. त्या तुमचा लूक पूर्ण करतातच, शिवाय एक शाही टचदेखील देतात. पोटली बॅग्ज हलक्या, स्टायलिश आणि ट्रेंडी असल्यामुळे लेहेंगा, साडी, अनारकली किंवा शरारा अशा कोणत्याही पेहरावासह सहज कॅरी करता येतात. चला तर मग, खास प्रसंगासाठी वापरण्याजोग्या काही उत्तम पोटली क्लच बॅग्जविषयी जाणून घेऊ या.

* जरी वर्क पोटली बॅग्ज: लाल, मरून, सोनेरी आणि रॉयल ब्लू यासारख्या सुंदर रंगांमध्ये जाड जरी आणि सोनेरी धाग्याच्या भरतकामाच्या डिझाइनसह येणाऱ्या या पोटली बॅग्ज अत्यंत सुंदर दिसतात.

* फुलांचे भरतकाम केलेली पोटली: मखमली किंवा रेशमी कापडावर सुंदर फुलांची भरतकाम असणारी पोटली दिवसाच्या लग्न, हळद, मेहंदी, रिसेप्शन यासारख्या कोणत्याही समारंभांस नेण्यासाठी सर्वोत्तम पर्याय आहे.

* सिक्विन आणि बीड वर्क पोटली: चमकदार मणी, मोती आणि सिक्विन्सने सजवलेल्या या पोटली बॅग्ज विशेषत: सायंकाळच्या समारंभांसाठी किंवा रिसेप्शनसाठी तुम्हाला ग्लॅमरस लूक देतात.

* आरसे वा काचेच्या कामाची पोटली: गुजराती किंवा राजस्थानी टच असणाऱ्या या पोटली बॅग्ज इंडो-वेस्टर्न ड्रेसेससह अधिक छान दिसतात.

* कुंदन आणि दगडांनी जडलेली पोटली: या प्रकारच्या बॅग्ज वापरणे हा एक शाही अनुभव असतो. म्हणूनच विशेषतः नववधूंनी याचा विचार करावा. त्यात गोल्डन किंवा ऑफ-व्हाइट टोन खूप सुंदर दिसतो.

## लुसीने लक्ष्य गाठले

मानिनी

तीस वर्षीय अमेरिकन टेक उद्योजिका लुसी गुओ हिने फोर्ब्सच्या २०२५ च्या सर्वात श्रीमंत स्वयं-निर्मित महिला यादीत प्रवेश करुन इतिहास रचला आहे. तिने जगातील सर्वात तरुण स्वयं-निर्मित अब्जाधीश महिलेचा किताब जिंकला असून आता ती प्रसिद्ध गायिका टेलर स्विफ्ट सारख्यांच्या पंक्तीत येऊन बसली आहे.



भारतीय चलनात मोजायचे तर आजमितीस लुसीची एकूण संपत्ती सुमारे ११,१५४ कोटी असल्याचे सांगितले जाते. तिचे पालक चीनहून अमेरिकेत आले. दोघेही इलेक्ट्रिकल इंजिनिअर होते. तथापि, त्यांना आपल्या मुलीने तंत्रज्ञान क्षेत्रात जाऊ नये असे वाटत होते. तिच्यासाठी हे एक कठीण क्षेत्र असल्याचे त्यांचे मत होते. परंतु लुसीने माध्यमिक शाळेतच कोडिंग शिकण्यास सुरुवात केली आणि बाळाचे पाय पाळण्यात दिसू लागले. तिने अमेरिकेतील कार्नेगी मेलॉन विद्यापीठात संगणक विज्ञानाचा अभ्यास सुरु केला आणि २०१४ मध्ये थिएल फेलोशिप (८६ लाख रुपयांची शिष्यवृत्ती) मिळाल्यानंतर कॉलेज सोडले.

पुढे २०१६ मध्ये लुसीने प्रसिद्ध फॅशन डिझायनर अलेक्झांडर वांग यांच्यासवे 'स्केल एआय'ची स्थापना केली. ही कंपनी डेटा ॲनोटेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस मॉडिल प्रशिक्षण देत असे. परंतु २०१८ मध्ये काही मतभेदांमुळे लुसीने ही कंपनीही सोडली. पण तिने कंपनीतील आपला हिस्सा विकला नाही. आज याच 'स्केल एआय'चे मूल्य सुमारे २.१५ लाख कोटी इतके आहे. त्यामुळे तिच्या हिस्सेदारीचे मूल्य आजही वेगाने वाढले आहे.

पुढे म्हणजेच २०२२ मध्ये तिने 'पासेस' नावाचे डिजिटल प्लॅटफॉर्म लाँच केले. याद्वारे कंटेंट क्रिएटर्स त्यांच्या चाहत्यांशी थेट कनेक्ट होऊ शकतात. त्यात लाईव्ह स्ट्रीमिंग, वन-ऑन-वन मेसेजिंग आणि एक्सक्लुझिव्ह पॉडकास्ट यासारखी अनेक वैशिष्ट्ये आहेत. 'पासेस'ने ४३० कोटी रुपयांची उलाढाल नोंदवली आणि हेच लुसी अब्जाधीश होण्याचे हे एक मुख्य कारण ठरले.


लुसी केवळ एक यशस्वी व्यावसायिक महिलाच नाही तर फिटनेस फ्रिक देखील आहे. सध्याच्या धावपळीच्या जगात आरोग्य जतनाचे महत्त्व ती नेमकेपणाने जाणते. यामुळेच ती दररोज २० किलोमीटर धावते आणि सुट्टीच्या दिवशीही आठ तास काम करते. अगदी जेवणासाठीही ती डेस्क सोडत नाही.

आज ती प्रसिद्ध वास्तुविशारद झाहा हदीद यांनी डिझाइन केलेल्या घरात राहते. या घरात इनडोअर पूल, फिटनेस सेंटर, थिएटर आणि रूफटॉप हेलिपॅड यासारख्या सगळ्या आलिशान सुविधा आहेत.

## जाणीव करून दे

काय करू?

मी ३२ वर्षीय विवाहिता असून लग्नाला चार वर्षं झाली आहेत. माझे पती घरी फारसा वेळ देत नाहीत. दिवसातले बरेच तास ते ऑफिसमध्ये असतात. तेही ही बाब मान्य करतात. त्यांना काम करायला खूप आवडतं. आपल्याला ऑफिसमध्ये निवांतपणा मिळत असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. तसंच घरी आल्यावर घरातल्या कामांची जबाबदारी पडत असल्यामुळे स्वत:साठी अजिबात वेळ मिळत नसल्याचं ते सांगतात. मी गृहिणी आहे आणि मला स्वत:लाही वेळ हवा असतो. त्यांनी घरी आल्यावर थोडा वेळ मुलाला सांभाळावं, ही माझी अपेक्षा चुकीची आहे का? त्यातच आज अनेक जोडपी कामाची जबाबदारी वाटून घेतात. माझ्या पतीला हे कसं समजावून सांगू?



– मला वाटतं, तू पतीकडे या भावना व्यक्त कर. त्याला परिस्थितीची कल्पना आहेच. त्यामुळे पुन्हा एकदा ही परिस्थिती कथन करण्यात काहीच अर्थ नाही. ऑफिसमध्ये समर्पित भावनेने काम करत असल्याबद्दल तू त्याचं कौतुक कर. या नात्याकडून त्याला असणाऱ्या अपेक्षांबद्दल जाणून घे. हे नातं पुढे नेण्यासाठी काय करायला हवं याबाबत त्याच्याशी चर्चा कर. तसंच तुम्हा दोघांसाठी नियमावली तयार कर. पती-पत्नी म्हणून एकमेकांना वेळ देण्याची गरज असल्याची जाणीव त्याला करून दे. तुम्ही दोघं समुपदेशकाकडेही जाऊ शकता.

## घरात ऑफिस थाटताना...

स्कील डेव्हलपमेंट



घरून काम करणं ही संकल्पना कितीही आकर्षक वाटत असली तरी वाटते तितकी सोपी नक्कीच नसते. तुम्ही ऑफिसमध्ये सगळा वेळ कामासाठी देता. पण घरी तसं नसतं. घरातली कामं खुणावतात. पै-पाहुणे येतात. मुलांचा दंगा सुरू असतो. अशा वेळी कामावरचं लक्ष उडू शकतं किंवा कामात अडथळे येऊ शकतात. त्यामुळे घरून काम करताना ऑफिससारखं वातावरण तयार करायला हवं. आपली कामं, प्रोजेक्ट्स, वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी तुम्ही काही टिप्स फॉलो करू शकता.

* घरून काम सुरू करण्याआधी एक जागा तयार करा. त्यासाठी घरातली वापरात नसणारी खोली किंवा एखादा कोपराही चालू शकेल. मात्र या ठिकाणी शांतता असायला हवी. घरातला गोंधळ, गडबड तुमच्यापर्यंत पोहोचता कामा नये. ही खोली किंवा कोपरा ऑफिसप्रमाणे सजवा. टेबल ठेवा. त्यावर पेनं तसंच गरजेच्या इतर वस्तू ठेवा. भिंतीवर काही कोट्सही चिकटवता येतील. यामुळे तुम्हाला ऑफिसमध्ये काम केल्याचा फील येईल.

* कामाचं नियोजन करा. ऑफिसच्या वेळेत कामाला सुरूवात करा. त्याआधी सर्व कामं आटपा. लंच ब्रेकमध्ये जेवा. त्यानंतर संध्याकाळपर्यंत काम करा. मधल्या काळात दहा ते पंधरा मिनिटं टी ब्रेक घ्या. सुरूवातीला हे सगळं अवघड जाईल. पण कालांतराने तुम्ही हे सगळं जुळवून आणाल.

* प्रत्येकजण ठराविक वेळी काम करू शकतो. काहींना रात्री जागून काम करायचं असतं तर काही सकाळी लवकर उठून काम करतात. घरून काम करताना तुम्ही हा लाभ घेऊ शकता. ऑफिसमध्ये ठराविक वेळी जावं लागतं. सकाळच्या वेळेत मेंदू ताजातवाना असतो. त्यावेळी अधिक चांगल्या पद्धतीने काम होऊ शकतं. तेव्हा आपण सर्वाधिक उत्पादकता कोणत्या वेळेत देऊ शकतो हे ठरवा आणि त्यानुसार काम करा.

## बाळाचा पहिला विमान प्रवास?

संगोपन

अलिकडच्या घटनेमुळे विमान प्रवासाबाबत एकप्रकारची भीती निर्माण झाली आहे. इतकी की, प्रवासी विमानप्रवासात हनुमान चालिसा म्हणत असल्याची दृश्येही आता पाहायला मिळत आहेत. मात्र काहीही असले तरी हा प्रवासाचा सर्वात सोयीस्कर मार्ग मानला जातो, यात शंका नाही. त्यामुळेच भीती दूर सारुन प्रवास करणे गरजेचे आहे.

सध्या अनेकांना लहान मुलांसह विमान प्रवास करावा लागतो. अशावेळी त्यांच्यासाठी तो सुरक्षित आहे की नाही? हा प्रश्न पडतो. तज्ज्ञांचा मते, दोन ते तीन महिन्यांच्या बाळाला घेऊन विमानाने प्रवास करण्यात कोणतीही जोखीम नाही कारण या वयात बाळाची रोगप्रतिकारक शक्ती विकसित होत असते. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी संसर्ग होण्याचा धोका नसतो.

* काही विमान कंपन्या अगदी दोन दिवसांच्या नवजात शिशुंनाही प्रवास करण्याची परवानगी देतात. परंतु आरोग्याच्या दृष्टिकोनातून हे योग्य मानले जात नाही. नवजात शिशुंची रोगप्रतिकारक शक्ती खूपच कमकुवत असल्यामुळे विमानतळांसारख्या गर्दीच्या ठिकाणी त्यांना संसर्गाचा धोका जास्त असतो. अशा परिस्थितीत, प्रवास करण्यापूर्वी बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आरोग्यानुसार बाळ विमान प्रवासासाठी सिद्ध आहे की नाही हे डॉक्टर ठरवू शकतात.



* प्रत्येक विमान कंपनीचे नियम वेगवेगळे असतात. काही विमान कंपन्या जन्मानंतर दोन आठवड्यांनंतर नवजात शिशुंना प्रवासास परवानगी देतात तर काही सात दिवसांच्या नवजात शिशुंनाही परवानगी देतात. विमान प्रवासादरम्यान डायपर, दूध किंवा फॉर्म्युला, गरम कपडे, पॅसिफायर इत्यादी आवश्यक वस्तू सोबत ठेवणे आवश्यक असते. * टेक-ऑफ आणि लँडिंग दरम्यान बाळाच्या कानात दाब जाणवू शकतो. असे झाल्यास ते रडते. हा त्रास कमी करण्यासाठी बाळाला दूध पाजावे तोंडात पॅसिफायर द्यावा. मुलाला शक्य तितके आरामशीर ठेवावे. गर्दी किंवा आवाजापासून दूर ठेवावे. पहिल्या विमान प्रवासासाठी दोन ते तीन महिने हे वय सर्वात योग्य समजले जाते. आधी सांगितल्यानुसार यापेक्षा कमी वयात प्रवास करणे आवश्यक असेल आणि डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यावा. सुरक्षित आणि आनंददायी प्रवासासाठी तयारी आणि सावधगिरी खूप महत्त्वाची आहे, हे कधीही विसरु नये.

## तंदुरुस्त ठेवणारा ॲक्वा योगा

स्टे फिट

आरोग्यासाठी योगासने वरदान मानले जाते. योग केल्याने केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यही सुधारते. योग अनेक प्रकारे केला जातो. आज आपण जल योगाबद्दल जाणून घेऊ या. याला 'ॲक्वा योग' किंवा 'पूल योग' असेही म्हणतात. हा योग विशेषतः स्विमिंग पूल किंवा इतर प्रकारच्या जलाशयात केला जातो. यात पारंपरिक योग आसनांना पाण्याच्या उपचारात्मक आणि सहाय्यक गुणांशी जोडले जात असल्यामुळे शरीर आणि मन दोघांनाही फायदा मिळतो.

* योगाच्या या खास शैलीमध्ये योगसाधना पाण्याच्या आत किंवा पृष्ठभागावर केली जाते. यामध्ये वृक्षासन, ताडासन, योद्धा आसन इत्यादी सामान्य आसने पाण्यात संतुलन साधून केली जातात. पाणी शरीराला आधार देत असल्यामुळे आसने सहजपणे करता येतात. जल योग शरीराला सहजता, शक्ती आणि शांती देण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

हा योग शरीर केवळ लवचिक आणि तंदुरुस्तच बनवत नाही तर मानसिक विश्रांती देखील देतो. म्हणूनच आजच्या धकाधकीच्या काळात याचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते.



* पाण्यात योगसाधना केल्यामुळे सांध्यांवर ताण पडत नाही. पाण्याचे तापमान शरीराच्या स्नायूंना आधार आणि आराम देते. खेरीज पाण्यात राहिल्याने मन शांत राहते आणि मानसिक ताण कमी होतो. पाण्यात आसने केल्याने शरीराचे संतुलन आणि लवचिकता सुधारते. पाण्यात योगा करताना शरीर अधिक मेहनत करत असल्यामुळे अतिरिक्त उष्मांक वेगाने जळतात आणि फिटनेस वाढतो.

* विशेषत: गुडघे किंवा पाठदुखी असणाऱ्या वृद्ध लोक, गर्भवती महिला (डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर), वजन कमी करायचे असणाऱ्यांसाठी ॲक्वा योगाचे विशेष लाभ मिळतात. त्याचबरोबर थकवा, ताण किंवा निद्रानाशाने ग्रस्त असणारे लोकही या माध्यमातून आराम मिळवू शकतात.

* अर्थातच जल योगा करताना काही बाबी लक्षात घ्यायला हव्या. जसे की, योगासने प्रशिक्षित योग शिक्षकाच्या देखरेखीखालीच करा. हा योगा कमी खोलीच्या पाण्यात करा. महत्त्वाचे म्हणजे श्वासोच्छवास आणि हालचालींवर लक्ष केंद्रित करा. शरीर हायड्रेट ठेवा. ही काळजी घ्या आणि शरीर सशक्त बनवा.

### हेअर केअर

#### डोकं खाजत असेल तर...



पावसाळ्यात केसांच्या समस्या वाढ्तात. त्वचाही निस्तेज दिसते. चेहरा आणि केसांचा हा कोरडेपणा दूर करण्यासाठी काही उपाययोजना करणं गरजेचं असतं. या दिवसात त्वचेवर पुरळही उठतं. त्यातही डोक्याची संवेदनशील त्वचा खाजू लागते. सतत भिजत असेल तर डोकं खाजवून वैताग येतो. तेव्हा डोक्याची खाज घालवण्यासाठी लिंबाचा वापर करता येईल. मात्र टाळूवर जंतूसंसर्ग झाला असेल तर लिंबाचा रस थेट लावू नये. हा रस तेलात मिसळून किंवा शँपूसोबत लावावा. लिंबामुळे जंतूसंसर्ग दूर होतोच शिवाय केस चमकदारही होतात. खोबरेल तेलामुळेही लाभ होऊ शकतात. यासोबतच बेकिंग सोडा आणि कांद्याचा रसही उपयुक्त ठरतो.

### स्कीन केअर

#### दूर करा मानेचा काळपटपणा



मानेचा काळपटपणा दूर करण्याचे काही घरगुती उपाय आहेत. यासाठी कच्च्या पपईचा पॅक तयार करून मानेला लावा. आधी कच्च्या पपईचे तुकडे वाटून घ्या. त्यात थोडं गुलाब पाणी आणि चमचाभर दही घालून घट्ट पेस्ट तयार करा. ही पेस्ट मानेला लावून पंधरा मिनिटांनी धुवून टाका.

* चमचाभर लिंबाच्या रसात चमचाभर मध घालून हे मिश्रण मानेला लावा. दहा मिनिटांनी धुवून टाका. बेकिंग सोड्यात थोडं पाणी घालून ही पेस्ट मानेला लावा. दहा ते पंधरा मिनिटांनी धुवून टाका. यापैकी एक उपाय नियमित केल्याने लाभ मिळू शकतील.

### किचन टिप्स

#### जपून वापरा मिक्सर



मिक्सर ग्राईंडर बराच काळ टिकून रहावा यासाठी त्याची नीट देखभाल करायला हवी. कधीही मिक्सर पूर्ण गतीने सुरू करू नका. टप्प्याटप्प्याने त्याचा वेग वाढवा आणि तसंच वेग कमी करत नेऊन मग बंद करा. मिक्सर पूर्ण वेगात असताना बंद केल्यास मशीनवर ताण येतो आणि मिक्सर लवकर खराब होऊ शकतो. मिक्सरची पाती नेहमी स्वच्छ ठेवा. मिक्सरच्या भांड्याचा वापर केल्यानंतर शेवटी त्यात थोडं पाणी घालून फिरवून घ्या. यामुळे पात्यात अडकलेले कण निघून जातील आणि भांडं नीट स्वच्छ होईल.




# प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी बंधनकारक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :



चंद्रपूर परिसरातील औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा खाणी व स्टील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या प्रश्नावर शासन जागरूक असून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

चंद्रपूर परिसर २०१० मध्ये क्रिटिकली पॉल्युटेड एरिया म्हणून नोंदवलेला होता, मात्र विविध उपायांमुळे प्रदूषण निदेशांक ८३ वरून ५४ वर आला आहे. यामुळे काही उद्योगांना अटींवर परवानग्या देण्यात आल्या आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर), डस्ट कलेक्टर, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम, जलप्रदूषण नियंत्रणासाठी ट्रीटमेंट प्लांट, पाण्याचा पुनर्वापर, रस्त्यांचे पक्कीकरण व फवारणीसारख्या अटी बंधनकारक करण्यात आल्या असल्याचेही मंत्री मुंडे यांनी सांगितले.

## गरिबांचा जीव धोक्यात : पटोले

काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी आज राज्यातील शासकीय रुग्णालयांतील दुरवस्थेचा मुद्दा विधानसभेत अधोरेखित केला. ते म्हणाले, राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी असताना, सध्या परिस्थिती याच्या पूर्ण विरोधात दिसत आहे. जिल्ह्यांतील सर्व सिव्हिल हॉस्पिटल्स सरकारने अक्षरशः संपुष्टात आणली असून, त्यांची जबाबदारी केवळ मेडिकल कॉलेजच्या डीनकडे सोपवण्यात आली आहे.

मंत्रीमहोदय म्हणतात की, आरोग्यविषयक सर्व सेवा दिल्या जातील आणि वित्त विभागाकडून निधी कमी केला जाणार नाही. पण प्रत्यक्षात, मेडिकल कॉलेजच्या वाढत्या नियंत्रणामुळे सिव्हिल हॉस्पिटल्स निष्प्रभ झाले आहेत. याचा थेट फटका सामान्य आणि गरिब रुग्णांवर बसत आहे. योग्य उपचार न मिळाल्यामुळे अनेक गरीब रुग्णांचा मृत्यू होतोय. ही गंभीर स्थिती पाहता सरकारने तातडीने ठोस उपाययोजना राबवायला हव्यात, अशी मागणी काँग्रेसचे नाना पटोले यांनी केली.

## केवळ निवडणुकीपुरते शेतकऱ्यांना आश्वासन

भास्कर जाधवांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :



मे महिन्यात अवेळी पाऊस पडला. यामुळे अनेक ठिकाणी नद्यांचे पाणी पात्राबाहेर गेले आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. १४ मे पासून रोजच पाऊस सुरू झाला. या पावसाने मोठी दाणादाण उडवली आहे. मराठवाड्यातील व विदर्भातील २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही आकडेवारी जानेवारी ते मार्च पर्यंतची आहे. वर्षभरात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मागच्या निवडणुकीच्या वेळी त्यांना आश्वासने दिली होती. आम्ही सात बारा कोरा करू असे सांगण्यात आले. पण आता हे सरकार म्हणत आहे कर्जमाफी करू, पण योग्यवेळी करू. लाडक्या बहिणींना म्हणाले २१०० रुपये देणार, नाही दिले. हे आश्वासने केवळ निवडणुकीपुरते होते, असा आरोप शिवसेना उबाठाचे आमदार भाष्कर जाधव यांनी केला.

### महा ट्रान्सकोमधील भरती परीक्षा पुढे ढकला

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विधानसभेत महा ट्रान्सकोमधील भरतीचा मुद्दा उपस्थित केला.

महा ट्रान्सकोमध्ये लोअर डिव्हिजन क्लार्क आणि असिस्टंट सिव्हिल इंजिनिअर (सिव्हिल) या पदांसाठी येत्या ६ जुलै रोजी परीक्षा होणार आहेत. ६० हजार उमेदवार परीक्षा देणार आहेत. यासाठीची बरीच परीक्षा केंद्रे ही अधिकृत नसून अत्यंत सुमार दर्जाची आणि अपारदर्शी आहेत. परीक्षेच्या दिवशीच आषाढी एकादशी आहे त्यामुळे, परीक्षा पुढे ढकलण्याचे निर्देश शासनाने द्यावे, असे ते म्हणाले.

# राज्यात आता २४ तास वाळूची वाहतूक

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

वाळू, रेतीची वाहतूक वैध परवाना देऊन २४ तास करण्याचे निवेदन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केले.



ते म्हणाले, वाळूचे उत्खनन सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत करता येते. या कालावधीत वैध परवाना असणाऱ्या वाहनांना वाळूची वाहतूक करता येते. वाळू व्यतिरिक्त इतर गौण खनिजांना २४ तास वाहतूक करता येते. काही शहरांत दिवसा वाहनांची रहदारी जास्त असल्यामुळे वाळूच्या वाहतुकीस बंदी असते.

अनेक ठिकाणी विविध प्रकल्पांचे काम विहित मुदतीत करण्यासाठी वाळूची मागणी वाढली आहे. शिवाय सायंकाळी ६ नंतर वाळूच्या वाहतुकीवर निर्बंध असल्याने उपलब्ध वाहनांचा वाळू पुरवण्यासाठी योग्य वापर होत नाही.

तसेच परराज्यातून राज्यात येणाऱ्या वाळूस झिरो रॉयल्टी पास देऊन २४ तास वाहतूक करण्यास परवानगी आहे. तथापि, राज्यातील वाळूच्या वाहतुकीस सायंकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत बंदी असल्यामुळे राज्यातील वाळूचा पुरेपुर वापर होत नाही. त्यामुळे सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उत्खनन करून ठेवलेली वाळू वैध वाहतूक परवाना देऊन, काही अटीशर्तींच्या अधीन राहून २६ वाहतूक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, असे ते म्हणाले.

वाळूसाठी वाहतूक परवाना ईटीपी तयार करण्यासाठी २४ तास सुविधा ही महाखनिजवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासाठी उत्खनन करून ठेवलेल्या वाळू रेती गटाचे जिओ फेन्सिंग करणे, सीसीटीव्ही बसवणे, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस डिव्हाईस बसवणे इत्यादी बाबी शासन निर्णयात समाविष्ट करण्यात आल्या आहेत, असेही बावनकुळे यावेळी सभागृहात बोलताना म्हणाले.

## बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी प्रवेशावर महत्त्वाचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :



बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये यापुढे विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार असून या संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबवण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधान परिषदेत दिली.

सारथी संस्थेमध्ये २०१८ ते २०२५ या कालावधीत ८३ अभ्यासक्रमांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांना शासनामार्फत विद्यावेतन, शिष्यवृत्ती आदी लाभ देण्यात आले. त्यापैकी ३ हजार म्हणजे केवळ १ टक्का विद्यार्थ्यांनी पीएचडी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला होता. त्या एक टक्का विद्यार्थ्यांसाठी २८० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला.

५ वर्षांत एका विद्यार्थ्यामागे ३० लाख रुपये खर्च झाला, ही बाब गांभीर्यानं घेण्यासारखी आहे. पुढच्या काळात ज्या अभ्यासक्रमांच्या आधारे रोजगार मिळेल, अशाच अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थी संख्या, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती यांची संख्या ठरवणं आणि गुणवत्ता वाढ यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे. त्या संदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे ते म्हणाले.

## सावत्र बापाने घेतला नऊ वर्षीय चिमुकल्याचा जीव

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३ :

सावत्र बापाने नऊ वर्षीय चिमुकल्याचा गळा आवळून जीव घेतल्याची संतापजनक घटना अकोट तालुक्यात घडली. दर्शन वैभव पळसकर (९) असे निष्पाप चिमुकल्याचे नाव आहे. सावत्र बाप आकाश साहेबराव कान्हेरकर याने त्याचा मित्र गौरव वसंतराव गायगोले याच्या मदतीने आपल्या सावत्र मुलाची निर्घृण हत्या केली.

अकोट शहर पोलीस ठाण्यात २ जुलै रोजी दर्शन पळसकर हा घरातून बेपत्ता झाला होता. त्याच्या आईने अकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस तपासात त्यांना सावत्र वडिलांवर संशय आला. दर्शन आपल्या सावत्र वडिलांसोबत जाताना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला होता. पोलिसांनी सावत्र बाप आकाशची कसून चौकशी सुरू केली. त्यानंतर आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने आपल्या मित्रासोबत दर्शनला दुचाकीवरून जंगलात नेले आणि त्या ठिकाणी गळा आवळून हत्या केल्याचे सांगितले.

आपल्या सावत्र मुलाची हत्या करण्यासाठी निर्दयी बाप आकाश याने आपल्या मित्राला केवळ ३०० रुपयांच्या मोबदल्यात गुन्ह्यात सहभागी करून घेतले होते. गौरव गायगोले नावाच्या या तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे.

## राज्य थॅलेसेमिया मुक्त करा

आमदार प्रवीण दटके यांची सरकारकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :



एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसा रूपात संक्रमित होणाऱ्या थॅलेसमिया या अनुषंगिक आजाराच्या मुक्तीसाठी केंद्र आणि राज्याने मिशन हाती घेतले आहे, परंतु ही मोहीम अधिक तीव्र करण्याची गरज असल्याचे दटके यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधले.

विदर्भात आणि विशेषतः नागपुरातच या आजाराचा टक्का चिंतन टाकणारा आहे. रुग्णांची संख्या निश्चित करण्यासाठी जास्तीत जास्त स्क्रीनिंग करण्याची आवश्यकता आहे.

नागपुरात मेयो आणि मेडिकलने एकत्रितपणे आतापर्यंत १ लाख ३८ हजार ४०८ जणांची तपासणी केली आहे , ही चाचणी अधिक व्यापक करून जास्तीत जास्त तपासण्या करण्यासाठी शासन कार्यक्रम आखणार आहे का?

शासनाच्या एसओपीप्रमाणे आरोग्य संस्था, नागपूर येथे प्रशिक्षण घेण्याबाबत कळविण्यात आले होते. आत्तापर्यंत किती प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात आले, याची माहिती सभागृहाला देणार का?

थॅलेसेमिया रुग्णांना आवश्यक औषधे उपलब्ध करून, नियमित तपासणी करून , रुग्णांना वेळेत रक्त मिळावे यासाठी एक समर्पित योजना तयार करणार का ?

विशेषतः विदर्भात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी विशेष प्रयत्न करणार का ? असे प्रश्न आमदार प्रवीण दटके यांनी आरोग्य मंत्र्यांना विचारले, यावेळी दटके यांच्या प्रश्नाला उत्तर देताना परभणीच्या धर्तीवर संपूर्ण राज्याकरिता एसओपी तयार केली असून त्याची अंमलबजावणी करणार असल्याचे आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.

याच विषयावर आमदार रणधीर सावरकरांनी प्रश्न उपस्थित करून चर्चा घडवून आणली.















■ नागपूर : दैनिक महासागर वृत्तपत्र समुहाचे संस्थापक संपादक आणि पत्रकारितेचे चालते बोलते विद्यापीठ श्रीकृष्ण चांडक यांचा ७७ वा वाढदिवस बुधवार २ जुलै रोजी महासागर कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले एसके प्रिंट सोल्युशनचे संचालक शशांक फुले यांनी श्रीकृष्ण चांडक यांचा सपत्नीक सत्कार करीत शुभेच्छा दिल्या.

महासागरचे सीईओ युएस लाल, संपादक मनोज बागडे, पीआरओ कमल नामपल्लीवार यांनीही मनोगत व्यक्त करीत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, रश्मी चांडक, ममता चांडक, सरिता चांडक, अनुप सोमगडे, मोना मोहबे, बच्चे कंपनीमधून भाविक, श्रीनी, पूर्वी चांडक, रिदम मोहबे, सानगडी येथील वितरक लोथे, कार्यालयातील दिलीपकुमार दुपारे, पुरण शुंकर, कश्मिरा भांगे, कैलास हेडावू, निलेश लोणारे, राहुल गुडधे, सचिन थाटे, सौम्यजीत ठाकूर, कोमल पराते, सुजाता बडांवार, प्रेमानंद हटवार, प्रियंका यादव, सुनंदा देव्हारे, सुषमा मार्जिवे, केतकी पराते, सातपैसे, पटले, माधव देव यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी श्रीकृष्ण चांडक यांना निरामय आरोग्यासह दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.